# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२५

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५ / अग्रहायण १९, १९४७ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**<br>**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री**<br>**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**<br>**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**<br>**(६) परिवहन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कामगारांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत

**(१) * ४९५९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कामगारांचे सन २०१८ पासून महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, वार्षिक वेतनवाढ, तसेच वेतनवाढीच्या फरकाची सुमारे ४४००-४५०० कोटी रूपयांची रक्कम प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकित देयके व मागण्यांच्या पार्श्वभूमीवर एस.टी कामगार सेनेने दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना ४५०० कोटी रुपयांची कामगारांची देणी प्रलंबित असल्याचे निवेदन दिले असून कामगार संघटनांनी कामगारांचे प्रश्न दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ पूर्वी न सोडविल्यास आक्रमक भूमिका घेवून‘काम बंद’ आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामगारांची रक्कम न देता राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बँकेची रक्कम तसेच कंत्राटदारांची देयके लेखा खात्याकडून नियमितपणे अदा करण्यात येत असून, या बाबीला जबाबदार असलेल्या लेखा खात्यातील संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासनाने राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कामगारांचे प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत व वैद्यकीय देयके, भविष्य निर्वाह निधी अंशदान, उत्सव अग्रिम व अन्य बाबींची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) महाराष्ट्र कामगार सेनेने दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ च्या निवेदनान्वये रा.प.कामगारांची थकीत आर्थिक मागण्या व इतर कामगार प्रश्नांची सोडवणूक दिनांक १० ऑक्टोंबर २०२५ पूर्वी न झाल्यास त्यानंतर कधीही कामबंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता.

(३) एसटी बँकेची प्रलंबित रक्कम ही कर्मचाऱ्यांच्या वेतनातील हप्त्यांपोटी केलेल्या कपातीची रक्कम असते. त्यामुळे सदर रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

रा.प. महामंडळास शासनाकडून स्थापत्य कामे व बस गाड्या खरेदी इत्यादी भांडवली स्वरुपाच्या कामासाठी भांडवली स्वरुपाचा शासननिधी उपलब्ध करुन देण्यात येत असतो, सदरचा निधी हा त्याच कारणासाठी वापरण्याचे शासनाकडून निर्देश असतात. त्यामुळे केवळ शासन निधीतील स्थापत्य कामे व बस खरेदी यांची देयके कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अदा करण्यात येत आहेत. नियमानुसार देयके अदा करण्यात आलेली असल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) माहे मार्च, २०२५ अखेर रा.प कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके अदा करण्यात आलेली असून उर्वरीत देयके निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याची कार्यवाही चालु आहे.

माहे मार्च देय एप्रिल २०२५ च्या वेतनापासून शासनाकडुन सवलत मुल्यांच्या मागणीची पूर्ण रक्कम रा.प. महामंडळास प्राप्त होत आहे, त्यामुळे माहे मार्च देय एप्रिल २०२५ पासून भविष्य निर्वाह निधी अंशदानाची कपातीची रक्कम कालमर्यादेत नियमितपणे भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास वर्ग करण्यात येत आहे.

एसटी कर्मचारी यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आलेली होती. सदर बैठकीत रा.प. कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट व सण अग्रीम तसेच माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२४ या कालावधीतील मूळ वेतनवाढीतील फरक व त्यावरील महागाई भत्ता व घरभाडे भत्त्याच्या अनुज्ञेय फरकासह ४८ समान हप्त्यात थकबाकी देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार दिनांक १६ ऑक्टोंबर, २०२५ रोजीच्या शासननिर्णयान्वये राप महामंडळाच्या कर्मचारी /अधिकारी यांना दिवाळी भेट व सण अग्रिमसाठी रुपये १०७.१७ कोटी इतका निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे.

(५) निधीची कमतरता असल्याने विलंब होत आहे.

-----------------

## इतर मागास बहुजन कल्याण समाजाच्या विकासासाठी १९ महामंडळाना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२) * ५१३९ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास बहुजन कल्याण समाजाच्या विकास आणि कल्याणासाठी स्थापन केलेली एकूण १९ महामंडळे आर्थिक तरतूद नसल्यामुळे निष्क्रिय अवस्थेत असून, या महामंडळांच्या माध्यमातून इतर मागास बहुजन कल्याण समाजातील दुर्बल घटकांना कर्जवाटप करणे व शैक्षणिक योजना राबविणे ही उद्दिष्टे पूर्ण न झाल्याने त्यांच्यामध्ये नाराजी व तीव्र संतापाची भावना निर्माण झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळांच्या अपेक्षित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ५० कोटी रुपयांच्या निधीची घोषणा करण्यात आली असून, उक्त निधी उपलब्ध न झाल्यामुळे इतर मागास बहुजन कल्याण प्रवर्गातील जनतेमध्ये तीव्र असंतोषाची भावना पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित महामंडळांना सक्षम करून त्यांच्यामार्फत इतर मागास बहुजन कल्याण समाजाचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) राज्यातील इतर मागास वर्ग समाजातील दुर्बल घटकांना कर्ज वाटप व इतर योजनांच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ व त्याअंतर्गत एकूण१४ उपकंपन्यांची स्थापना करण्यात आली आहे.

ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने मुख्य कंपनीच्या पोर्टलद्वारे अस्तित्वातील योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात येत आहे. माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या मुख्य कंपनी व त्याअंतर्गत स्थापित १४ उपकंपन्यांमार्फत आजपावेतो एकूण २९,१६२ लाभार्थ्यांना रू. ५६९५५.६६ लाख इतक्या रकमेची मंजूरी देण्यात आली आहे.

सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या मुख्य कंपनी व त्याअंतर्गत स्थापित उपकंपन्यांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरीता रु.४,४४,८७,०००/- इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ या मुख्य कंपनीला भाग भांडवली अंशदानाकरीता मूळ तरतूद रु.१५ कोटी व सन २०२५ च्या दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे रू.५० कोटी अशी एकूण रू.६५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.९ कोटी इतके भाग भांडवली अंशदान वितरीत करण्यात आलेले आहे व रु. १५ कोटी इतके भाग भांडवली अंशदान वितरीत करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. तसेच महामंडळाला सहायक अनुदानासाठी मूळ तरतूद रु. ५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे व त्यापैकी रु. ३ कोटी इतके सहायक अनुदान महामंडळाला वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच सन २०२५ मध्ये स्थापन झालेल्या नवीन १० उपकंपन्यांना मुख्य कंपनीकडून प्रत्येकी रु.२ कोटी प्रमाणे रु.२० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारस (जि.अकोला) येथील औष्णिक विदयुत प्रकल्पाच्या निधी अंतर्गत बांधलेल्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३) * ५६५३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारस (जि.अकोला) येथील औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या सी.आर.एस निधी अंतर्गत १४.५ कोटी रुपये खर्च करुन टी.पॉईंट ते बाळापूर नॅशनल हायवेपर्यंत रस्ता बांधण्यात आलेला असून, सदर ३ कि.मी. रस्त्याची बांधकामानंतर एक महिन्याच्या कालावधीमध्ये दुरवस्था झाली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पारस औष्णिक केंद्राचे मुख्य कार्यकारी अभियंता यांच्याकडे दिनांक १४ सप्टेंबर, २०२५ रोजी लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे माहिती मागविली असता माहिती देण्यास नकार दिला असून, विद्युत केंद्राचे अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने १० कोटी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून त्यानुषंगाने कंत्राटदार व अन्य संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पारस (जि.अकोला) येथील टी.पॉईंट ते बाळापूर नॅशनल हायवेवरुन महानिर्मिती कंपनीमधील राखेची वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे रस्ता खराब झाल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती महानिर्मिती कंपनीने करण्याबाबतची मागणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांनी केली होती.

सदर मागणी प्रमाणे रस्ता दुरुस्तीचे काम सुरु असून दिनांक २२/०७/२०२५ रोजी पारस परिसरामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बांधकामाधीन रस्त्याचे नुकसान झालेले आहे.
(२) मा.श्री.अमोल मिटकरी, वि.प.स. यांची दिनांक ०२/०९/२०२५ व दिनांक २३/०९/२०२५ रोजीचे पत्रे महानिर्मिती कंपनीस प्राप्त झालेली आहेत. त्यास अनुसरुन महानिर्मिती कंपनीने त्यांच्या दिनांक १२/०९/२०२५ व दिनांक २१/१०/२०२५ रोजीच्या पत्रांन्वये मागणी केलेली उपलब्ध माहिती दिलेली आहे. तथापि, सदर रस्ता दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असून अंतिम चाचणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. सदर अहवाल महानिर्मिती कंपनीस प्राप्त झाल्यानंतरच लोक प्रतिनिधींना उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

सदर रस्ता दुरुस्तीसाठी कार्यादेशानुसार एकूण खर्च रुपये १४.५० कोटी असून पायाभूत स्तराच्या कामासाठी आतापर्यंत रुपये ७.१५ कोटी रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आलेली आहे. सबब, रस्ता बांधकामात १० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब खरी नाही.

सदर रस्ता दुरुस्तीचे काम दिनांक १३/०१/२०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजित आहे. (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वाहतूक पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांचेकडून ई-चलन तयार करण्यासाठी खाजगी मोबाईल फोनचा वापर करण्यात येत असल्याबाबत

**(४) * ४७८७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ई-चलन ची कारवाई करताना वाहतूक पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी खाजगी मोबाईल फोनचा वापर फोटो किंवा चित्रीकरणासाठी करू नये, अशा आशयाचे आदेश अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाने दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाचे उल्लंघन करून अनेक पोलीस अधिकारी/अंमलदार अद्यापही स्वतःच्या खाजगी मोबाईल फोनद्वारे फोटो काढून, वास्तविक वेळ सोडून, ते सोयीनुसार ई-चलन प्रणालीमध्ये

अपलोड आणि चुकीच्या पध्दतीने चलन तयार करित असल्याचे निदर्शनास आले असून, वाहतूक पोलिसांव्यतिरिक्त स्थानिक पोलीस ठाण्यातील काही अधिकारी व कर्मचारी देखील वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अधिकार नसतानाही खाजगी मोबाईल फोनचा वापर फोटोसाठी करून वाहनचालकांची लूट करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले असून वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी नियमबाह्य पध्दतीने वाहनचालकांना दंड व ई-चलन तयार करणाऱ्या वाहतूक तसेच स्थानिक पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर या घटकात ई-चलन कारवाई करताना खाजगी मोबाईल फोनचा वापर करण्यासंबंधी १ प्रकरण समोर आले आहे. यासंबंधी संबंधित अंमलदारावर कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील अंमली पदार्थांच्या तस्करीस प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५) * ५५२९ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर गांजा, ड्रग्ज, अंमली पदार्थ तसेच मॅफेड्रॉन यांची आवक सुरू असल्याची माहिती उपलब्ध झाली असून माहे मे, २०२५ मध्ये २६४ किलो ७०५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गांजा, ड्रग्ज व अंमली पदार्थ विविध वाहतूक साधनांच्या माध्यमातून शहरात येत असून देखील पोलिसांकडून दोषींविरुध्द अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत कोणते निष्कर्ष आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गांजा, ड्रग्ज, अंमली पदार्थ तसेच मॅफेड्रॉन यांच्या तस्करीस प्रतिबंध करण्यासाठी आणि तस्करी करणाऱ्या दोषींविरुध्द कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या कार्यक्षेत्रामधील विविध पोलीस स्टेशनमध्ये माहे जानेवारी, २०२५ पासून ते मे, २०२५ पर्यंत गांजा या अंमली पदार्थाबाबत एकूण ४५ गुन्हे दाखल असून त्यामध्ये एकूण २६४ किलो ७०५ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आलेला आहे.

(२) व (३) पोलीस आयुक्त पुणे शहर यांच्या कार्यक्षेत्रामध्ये माहे जानेवारी, २०२५ ते ऑक्टोबर, २०२५

पर्यंत एनडीपीएस ॲक्ट अन्वये एकूण १८९ गुन्हे दाखल असून त्यात एकूण रुपये ५,५५,८५,३२८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांमध्ये एकूण २८७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पुणे शहर घटकामध्ये खालीलप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती उपायोजना करण्यात येतात.

शालेय विद्यार्थ्यांना अंमली पदार्थ सेवनाने शरीरावर होणारे दुष्परिणाम, जवळ बाळगणे, खरेदी करणे अथवा त्यामुळे वाढणारी गुन्हेगारी याबाबत व्याख्याने/ रॅलीज/ पथनाट्य इत्यादींमार्फत जनजागृती करण्यात आली. तसेच दहीहंडी उत्सवामध्ये व झोपडपट्टी परिसरामध्ये अंमली पदार्थ सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यात आली.

पोलीस स्टेशन हद्दीत ३० ठिकाणी पोस्टर व बॅनर माध्यमातून जाहिरात करून अंमली पदार्थ विरोधात संदेश देण्यात आले. तसेच जनजागृतीपर ४ रॅली काढण्यात आल्या त्यामध्ये सुमारे २०० नागरिक सहभागी झाले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(६) * ४६७० श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील नद्यांचे आरोग्य स्पष्ट करणारा ‘पोल्यूटेड रिव्हर स्ट्रेचेस फॉर रिस्टोरेशन ऑफ वॉटर क्वालिटी’ या प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्रातील सर्वाधिक ५४ नद्या प्रदूषित असून, सदर अहवालामध्ये महाराष्ट्र सलग तिसऱ्या वर्षीही पहिल्या क्रमांकावर असल्याची चिंताजनक बाब दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालानुसार राज्यातील पुणे, मुंबई आणि सोलापूर जिल्ह्यांतील नद्यांमधील जलपट्टे सर्वाधिक प्रदूषित असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नदयांचे प्रदूषण हे शहरातील सांडपाणी अणि कारखान्यांमधून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक पाण्यामुळे होत असून, सदर पाणी हे विनाप्रक्रिया नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्याने संबंधित दोषी कारखान्यांचे परवाने रद्द करण्याबाबत व कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्र राज्य पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, सदर प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे काय तसेच सदर प्राधिकरणाकडे कोणकोणती कामे सोपविण्यात आली आहेत,

(५) असल्यास, राज्यातील नद्यांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले प्रदूषण हा अत्यंत गंभीर विषय असल्याने शासनाने त्याकडे विशेषत्वाने लक्ष देऊन सदर प्रदूषण रोखण्याकरीता कोणत्या ठोस उपाययोजनांची अंमलबजावणी केली आहे वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार देशभरात २९६ प्रदूषित नदी पट्टे असून सर्वात जास्त ५४ प्रदूषित नदी पट्टे महाराष्ट्रात आहेत. तथापि, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यांची क्रमवारी जाहीर केलेली नसून प्राथम्यत: क्रमांक १ च्या वर्गवारीत महाराष्ट्र राज्य ५ व्या क्रमांकावर आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार पुणे जिल्हातील नदी प्रदूषित पट्यांची संख्या ५ असून मुंबई जिल्हातील नदी प्रदूषित पट्यांची संख्या १ व सोलापूर जिल्हातील नदी प्रदूषित पट्यांची संख्या २ आहे. तथापि, उर्वरीत ४६ प्रदूषित नदी पट्टे महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्हात आहेत.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सद्य:स्थितीमध्ये प्रदूषित नदीपट्ट्यातील क्षेत्रात एकूण ९५ घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यरत असून ५० घरगुती सांडपाणी प्रक्रीया केंद्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

- तसेच राज्यातील प्रदूषित नदीपट्ट्यातील क्षेत्रात नवीन १०२ घरगुती सांडपाणी प्रक्रीया यंत्रणेबाबतचे विविध योजनेंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व जल प्रदूषणकारी उद्योगांनी प्राथमिक/ द्वितीय/तृतीय स्वरूपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविलेली असून सदर उद्योगांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविल्याची शहानिशा केल्यानंतर उद्योग सुरू करण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र दिले जाते.
- तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये आद्योगिक सांडपाणी व्यवस्थापनेसाठी एकूण २६ ठिकाणी सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत.

(४) राज्यातील नद्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली पर्यावरण (संरक्षण) कायदा,१९८६ च्या कलम ३ (३) अंतर्गत महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण (MSRRA) गठीत करण्याचे प्रस्तावित आहे. यात प्रमुख कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश असेल. सदर प्राधिकरणाचे प्रामुख्याने राज्यातील घोषित नदी प्रदूषित पट्ट्यांच्या अनुषंगाने नदी संवर्धन प्रस्तावांना मान्यता देणे आणि राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत (NRCP) समावेशासाठी NRCD कडे शिफारस करणे, नदी-खोरे व्यवस्थापन आराखड्यास मान्यता देणे, नदी संवर्धन प्रस्तावांच्या प्रभावी अंमलबजावणीस्तव जमीन अधिग्रहण, अतिक्रमण, वीज पुरवठा अशा स्वरुपांच्या उद्भवणाऱ्या समस्यांबाबत विविध विभागांसमवेत समन्वयन व निराकरण, पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या कलम ५ अंतर्गत निर्देश जारी करणे व कलम १० अंतर्गत प्रवेश आणि तपासणीचे अधिकार वापरणे असे अधिकार/कार्य असेल.

- महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापित करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागास दिनांक १८/९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आलेला असून सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन आहे.

(५) महाराष्ट्र शासनाने दिनांक १३/१२/२०१८ रोजी नदी पुनरुत्थान समिती गठीत केली असून सदर समितीमध्ये पर्यावरण, उद्योग, नगरविकास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नगरपरषिद प्रशासन संचालनालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे.

- सदर समितीने ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करुन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केले आहेत. सदर कृती आराखड्यांच्या अंमलबजावणीचे काम विविध विभागामार्फत चालु आहे.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त प्रदूषणकारी उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन सदर पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दोषी उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त कारवाई केली जाते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे सांडपाणी व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापनासाठी भांडवली खर्चातून २५ टक्के रक्कम राखीव ठेवण्याचे बंधनकारक केले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीतून मुली बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(७) * ५४१५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीत शाळेत शिकणाऱ्या आणि महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या ८९ मुली बेपत्ता झाल्या असून, सदर अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांमुळे पालकवर्ग चिंताग्रस्त असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने बेपत्ता झालेल्या सर्व अल्पवयीन मुलींना शोधण्यासाठी पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील अभिलेख पाहता, माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये शाळेत शिकणाऱ्या आणि महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या एकूण ७८ मुली बेपत्ता झाल्या होत्या त्यापैकी ६७ मुली मिळुन आलेल्या आहेत. उर्वरीत ११ बेपत्ता मुलींचा शोध सुरू आहे.

(२) पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर यांच्या कार्यक्षेत्रातील बालकांच्या अपहरणकर्त्यांविरुध्द तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्याशी संबंधित व्यक्तींचे मोबाईल एडीआर सीडीआरच्या आधारे तात्काळ शोध घेण्याबाबत पोलीस अधिकारी/अंमलदार यांना आदेश देण्यात आले आहेत. तसेच मोबाईल नंबर उपलब्ध नसल्यास सीसीटिव्ही फुटेजच्या आधारे अपहृत बालकांचा शोध घेण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे चाईल्ड मिसींग साईटवर माहिती अपलोड करण्यात आलेली आहे व दुरदर्शनवर माहिती प्रसारीत करण्यात आलेली आहे. संबंधित परिसरातील पोलीस ठाण्यात तपास याद्या पाठविण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहनांच्या दिव्यांच्या तीव्र प्रकाशामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(८) * ५६४६ श्रीमती चित्रा वाघ, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रिक्षा, कार तसेच मालवाहू वाहनांवर प्रखर हेडलाईट, एलईडी व निऑन लाइटिंग बसविण्याचे प्रमाण झपाट्याने वाढले असून, या तीव्र प्रकाशामुळे रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनचालक, पादचारी किंवा दुचाकीस्वार यांच्या दृष्टीस अडथळा निर्माण होऊन डोळयांचे नुकसान, दृष्टीदोष, डोळयांची जळजळ, लक्ष विचलित होणे इत्यादी त्रास निर्माण होऊन अपघातांचे प्रमाण वाढत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेत्रतज्ज्ञांच्या मते तीव्र एलईडी प्रकाश नेत्रपटलाच्या न्यूरॉन्सवर परिणाम करून काही काळासाठी अंधत्व, डोळयांवरील ताण व दृष्टीदोष निर्माण होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रखर एलईडी किंवा निऑन लाइटिंगमुळे पादचारी व वाहनचालकास होणाऱ्या धोक्यामुळे अपघातांची नोंद शासनाच्या नोंदीत झालेली आहे काय तसेच बेकायदेशिररित्या वापरण्यात येणाऱ्या प्रखर हेडलाईट, एलईडी व निऑन लाईटिंगची तपासणी व नियंत्रणासाठी कोणती अधिकृत यंत्रणा कार्यरत आहे,

(४) असल्यास, तीव्र प्रकाशयुक्त दिव्यांच्या वापराबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उच्च तीव्रतेच्या प्रकाशयुक्त दिव्यांच्या वापराबाबत तांत्रिक मानदंड, प्रकाशमान मर्यादा किंवा नियंत्रण यंत्रणा निर्माण करुन त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १०५ मध्ये हेडलाईट बाबत तरतूद असून नियम १०६ मध्ये दिव्याची वक्रता (Deflection of Lights) बाबत तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार नियम १२४ व नियम १२४ (A) अंतर्गत केंद्र शासनाने अधिसुचित केलेल्या प्रकाश किरणाबाबत लागू असलेल्या सुरक्षा मानकांचे पालन वाहन उत्पादकाने करणे बंधनकारक आहे.

केंद्र शासन अधिसूचना क्रमांक एस. ओ.१३६५ (ई), दिनांक १३/१२/२००४ व सुधारीत अधिसूचना क्रमांक एस.ओ. ५४१ (ई), दिनांक ३०/०३/२००५ नुसार, दिनांक ०१/०४/२००५ पासून निर्मीत दुचाकी व तीनचाकी वाहनाकरिता तसेच दिनांक ०१/१०/२००५ पासून निर्मित चारचाकी वाहनांकरिता सुरक्षा मानके ए.आय.एस.-०३४/२००४ लागू झाली आहेत. वाहन चालकाचे डोळे हेडलाईटच्या प्रकाश किरणांमुळे दिपले जाणार नाहीत याबाबतची तरतूद या मानकांमध्ये नमूद आहे.

नियमांचा भंग करुन वाहनांच्या हेडलाईट मध्ये नियमबाह्य बदल करणाऱ्या वाहनांची तपासणी करुन, दोषी वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करणेबाबत तसेच नियमबाह्य हेडलाईट न लावणेबाबत जनजागृती करणेबाबत क्षेत्रिय कार्यालयांना सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

सन २०२४-२०२५ या कालावधीत नियमांचा भंग करून वाहतूक करणाऱ्या ८५३५ दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली असून एकूण रुपये ३९,४४,४००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या "ई-शिवनेरी" बससेवेच्या खंडीत वीजपुरवठ्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत

**(९) * ५६२० श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत पुणे-मुंबई मार्गावर चालविण्यात येणारी "ई-शिवनेरी" ही बससेवा खंडित वीजपुरवठ्यामुळे वारंवार विस्कळीत होत असल्याची तसेच चार्जिंग स्टेशनवर आवश्यक तेवढा विद्युत पुरवठा उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'ई-शिवनेरी' बससेवा नियमितपणे चालू ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या चार्जिंग स्टेशनवरील विद्युत पुरवठा सुरळीत रहावा तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळाकडून (MSEDCL) एस.टी. महामंडळाला आवश्यक तेवढा आणि अखंड वीजपुरवठा मिळावा यासाठी कोणती समन्वय यंत्रणा तयार करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर सेवेसाठी स्वतंत्र बॅकअप वीजपुरवठा (उदा. जनरेटर, सौरऊर्जा इ.) उपलब्ध करून देण्याबाबत, तसेच भविष्यातील 'ई-शिवनेरी' सेवा विस्ताराच्या अनुषंगाने चार्जिंग स्टेशनची संख्या वाढविण्याबाबत आणि बससेवा खंडित झाल्यामुळे प्रवाशांच्या झालेल्या गैरसोयीसंदर्भात जबाबदार अधिकारी किंवा कंत्राटदार यांच्याविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२) चार्जिंन स्टेशन करिता विद्युत पुरवठा अखंडीत रहावा याकरिता पर्यायी विद्युत पुरवठ्याची (अतिरीक्त विद्युत वाहिनी) व्यवस्था करण्यात आलेली आहे. विद्युत पुरवठा सुरळीत चालू रहावा याकरिता स्थानिक स्तरावरुन महावितरण कंपनीचे अधिकारी यांना कळविण्यात येते.

(३) व (४) भविष्यात वाढणाऱ्या ई-बसेससाठी लागणाऱ्या विद्युत भाराची गरज लक्षात घेता स्वारगेट आगारामध्ये ५००० केव्हीए इतक्या विद्युत भारासाठी महावितरण कंपनीकडे मागणी केली आहे. त्यानुसार कामे सुरु करण्यात आली आहेत. तसेच, याठिकाणी सौरऊर्जेद्वारे विद्युत पुरवठा करण्याचे विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील गोशाळांमधील जनावरांची अवस्था बिकट असल्याबाबत

**(१०) * ५८२८ श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये गाई, म्हशी, जर्सी गाई इत्यादी जनावरे ठेवण्यात येणाऱ्या गोशाळांची स्थिती अत्यंत बिकट असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, गोरक्षणाच्या नावाखाली अवैध धंदा चालविणाऱ्या काही गटांमुळे अनेक शेतकऱ्यांची लाखो रुपयांची जनावरे गोशाळांमध्ये बंद करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये लागू असलेला गोवंशहत्या बंदी कायदा गोपालकांना अत्यंत त्रासदायक ठरत असून, या कायद्यामुळे गोपालन करणारे शेतकरी, शेतमजुर व बारा बलुतेदार यांना प्रचंड मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याच्या अनेक तक्रारी सांगली, कोल्हापूर, सातारा व पुणे या जिल्ह्यात प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानंतरही अनेक जनावरे त्यांच्या मूळ शेतकऱ्यांना परत न करण्यात येत असल्याचे तसेच गोशाळांमध्ये जमा केलेली काही जनावरे गायब झाल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोहत्या प्रतिबंधक कायद्यामधून जर्सी, होलस्टीन व संकरित जनावरे यांना वगळण्याबाबत शेतकरी व पशुपालक संघटनांकडून सातत्याने मागणी होत असून, गोशाळांमध्ये ठेवलेल्या जनावरांसाठी चारापाणी, औषधे व नियमित पशुवैद्यकीय तपासणी सुनिश्चित करणे, जनावरांची बाजारातील खरेदी-विक्री करताना 'परमिटच्या गाडीतूनच वाहतूक' करण्याची अट शिथिल करणे तसेच शेतकऱ्यांची जप्त केलेली जनावरे परत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

प्राप्त तक्रारीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यात बोगस गोरक्षक बनवून लुटमार करणाऱ्या व्यक्तींविरुध्द पोलीस ठाणे, श्रीगोंदा व पोलीस ठाणे, शेवगाव येथे प्रत्येकी एक गुन्हा दाखल आहे.

(३) अशाप्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत.

(४) व (५) सेवानिवृत्त न्यायमूर्ती मा.श्री.कमलकिशोर तातेड यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जे गोवंशीय प्राणी भाकड / ओझे वाहण्यास असक्षम / अप्रजननक्षम झाले तरी ते मरेपर्यंत शेण व मूत्र देत असून शेण व मूत्र शेतीसाठी उपयुक्त ठरत असल्याने ते उपयुक्त प्राणी ठरत असल्याने गोहत्या प्रतिबंधक कायद्यातून वगळणे योग्य नसल्याचा अहवाल दिला आहे. सदर अहवाल मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात येत आहे.

पशुंची वाहतूक करतांना महाराष्ट्र प्राणी रक्षक अधिनियम, १९९५ तसेच प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० मधील तरतूदींचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने केंद्रीय मोटार वाहन

नियम १९८९ अन्वये भारतीय मानक ब्युरो (Bureau of Indian Standard) यांनी विहित केलेल्या मानकाप्रमाणे वाहन असणे आवश्यक आहे.

बेकायदेशिररित्या पशुंची वाहतूक करतांना पकडण्यात आलेल्या पशुंचे हस्तांतरण/संगोपन करण्याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक ०४/११/२०२२ नुसार विहित करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांमध्ये नियमबाह्य शिक्षक पदभरती केल्याबाबत

**(११) * ५२३१ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विजाभज अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक उपलब्ध असताना नियमबाह्य पध्दतीने शिक्षक पदभरती करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१९ नंतर अनेक नियमबाह्य शिक्षकांना नियुक्त्या प्रदान करण्यात आल्या असून, विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ मे, २०१९ नुसार 'पवित्र पोर्टल' द्वारे संगणकीय प्रणालीचा वापर न करता नियमबाह्यरित्या शिक्षक पदभरती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या राज्यातील विजाभज अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या नियमबाह्य नियुक्त्यांप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत कोणते निष्कर्ष आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षकांची निवड पवित्र पोर्टलमार्फत करण्याचा निर्णय या विभागाच्या दिनांक १५/०५/२०१९ अन्वये घेण्यात आला आहे. तसेच, सदर प्रणालीची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने अवंलबिलेल्या कार्यप्रणाली (SOP) नुसार विजाभज आश्रमशाळांमधील शिक्षकांची निवड पवित्र पोर्टलव्दारे करण्याबाबत या विभागाच्या दिनांक ०३/१२/२०२५ च्या शासन निर्णयान्वये पारदर्शक पध्दती विहित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पर्यावरणाशी संबंधित गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(१२) * ४७६२ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत पाच वर्षांत (२०१९ ते २०२४) नोंदविण्यात आलेल्या पर्यावरणाशी संबंधित गुन्ह्यांची संख्या, प्रकारवार विभागणी (उदा. प्रदूषण, अवैध खणन, जंगलतोड, प्लास्टिक बंदीचे उल्लंघन, वन्यजीव गुन्हे इ.) मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो (NCRB) च्या अहवालातून माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह अनेक जिल्ह्यात उपरोक्त प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून यावर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील औद्योगिक क्षेत्रे, बांधकाम प्रकल्प, वाळू-खणन, वने आणि नद्या या क्षेत्रांमध्ये पर्यावरणीय गुन्ह्यांवर देखरेख ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित मॉनिटरिंग यंत्रणा (ड्रोन सर्व्हे, जीआयएस ट्रॅकिंग, ऑनलाईन तक्रार प्रणाली इ.) विकसित करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पर्यावरण संरक्षण कायदा (Environment Protection Act, १९८६), जैवविविधता कायदा, वन्यजीव संरक्षण कायद्यातंर्गत कार्यवाही करण्यासाठी व पर्यावरण विभागाशी संबंधित असलेली प्रलंबित प्रकरणे गतीने निकाली काढण्याकरिता राज्यात स्वतंत्र "पर्यावरण गुन्हे शाखा" स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबई शहर तसेच महाराष्ट्रातील इतर घटकांमध्ये भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ व अनुषंगीक वन कायदे व नियमाच्या उल्लंघनाप्रकरणी गुन्हे दाखल असून तपास पूर्ण झालेल्या गुन्ह्यातील आरोपींवर मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहेत.

वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक रोखण्यासाठी अशा व्यक्तींवर जबर कारवाई करणे आवश्यक असल्याने, अशा व्यक्तींविरोधात विविध कायदे/अधिनियम/नियम याअन्वये फौजदारी कारवाई करण्याच्या तरतूदी महसूल विभागाच्या दिनांक ११/०७/२०२५ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या आहेत.

(३) वाळू-रेती निर्गती धोरण-२०२५ नुसार वाळू गटाचे GEO-FENCING करणे, उत्खनन केलेल्या वाळूची नोंद महाखनिज या संगणक प्रणालीवर ऑनलाईन घेणे, वाळू वाहतुकीसाठी ऑनलाईन ETP (वाहतूक पास) उपलब्ध करून देणे, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर GPS बंधनकारक करणे, प्रशासकीय यंत्रणेमार्फत महाखनिज ऑनलाईन प्रणालीवर वाहनाची ट्रॅकींग केली जाणे इत्यादींचा समावेश आहे.

तसेच, पर्यावरणीय गुन्ह्यांवर देखरेख ठेवण्याकरिता वन विभागामार्फत E-eye, FSI Fire alert system आणि ड्रोन प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

(४) पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ व त्याअंतर्गत असलेल्या नियमांतर्गत कसुरदारांविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ महाराष्ट्र राज्यातील विविध न्यायालयांमध्ये खटले दाखल करते.

तसेच, वन व वन्यजीव विभागाच्या जमिनीवरील गुन्ह्यांची दखल घेऊन नियमानुसार वन विभागाकडून कार्यवाही करण्यात येते.

तथापि, पर्यावरण संरक्षण कायदा (Environment Protection Act, १९८६), जैवविविधता कायदा, वन्यजीव संरक्षण कायदा याअंतर्गत कार्यवाही करण्यासाठी व पर्यावरण विभागाशी संबंधित असलेली प्रलंबित प्रकरणे गतीने निकाली काढण्याकरिता राज्यात स्वतंत्र "पर्यावरण गुन्हे शाखा" स्थापन करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथे संघटीत देहविक्री व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत

**(१३)** * **४९८६ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) येथे संघटीत देहविक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असून या देहविक्री व्यवसायात अंदाजे ३०० हून अधिक मुली असून, यात ६ प्रमुख टोळ्या सक्रीय असल्याचे तसेच ४० दलाल व ६० हँडलर्सचा समावेश असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक संस्था भूमाता यूथ फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि महिला प्रदेश चे अध्यक्ष यांनी याबाबत पोलीसांना अनेक ठोस पुरावे, छायाचित्रे आदी माहिती पुरविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने पोलिसांच्या हाती लागलेल्या पुराव्यानुसार किती जणांना अटक करण्यात आली तसेच दोषींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशी कोणतीही घटना पिंपरी -चिंचवड (जि.पुणे) येथे घडल्याची निदर्शनास आली नाही. तथापि, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष व पोलीस ठाणे यांचेमार्फत खालीलप्रमाणे कारवाया करण्यात आलेल्या आहेत.

अ) जानेवारी, २०२५ ते दि.३१.१०.२०२५ पर्यंत भा.न्या.सं. २०२३ चे कलम १४३ सह अनैतिक व्यापारास प्रतिबंध, १९५६ कायदा कलम ३,४,५ व ७ प्रमाणे - २७ गुन्हे

ब) अनैतिक व्यापारास प्रतिबंध, १९५६ चे कलम ८ प्रमाणे - १३४ गुन्हे

क) म.पो.अधि. ११०/११७ प्रमाणे २३९ खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाज्योती कडून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण पध्दतीत बदल करून विद्यावेतन बंद केल्याबाबत

**(१४) * ५६६१ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून (महाज्योती) स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नियमित प्रत्यक्ष वर्ग व मानधन स्वरूपातील मासिक विद्यावेतन बंद करून, योजनेतील नव्या बदलानुसार केवळ डिजिटल/ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारंपारिक प्रत्यक्ष प्रशिक्षण पध्दती आणि विद्यार्थ्यांना दिले जाणारे मासिक विद्यावेतन बंद करून डिजिटल प्रशिक्षण सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, या निर्णयामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांना मासिक विद्यावेतन न मिळाल्यामुळे त्यांच्यात नाराजी व संतापाची भावना निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांकडे स्थिर इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्याने डिजिटल प्रशिक्षणात अडथळे निर्माण होणार असल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन, अध्ययन केंद्रे किंवा भौतिक संसाधने उपलब्ध नसल्याने प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी विद्यार्थ्यांना विद्यावेतन आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण पुन्हा सुरू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

महाज्योती संस्थेमार्फत संघ लोकसेवा आयोग (UPSC), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा, संयुक्त गट ब व क तसेच मिलीटरी भरती प्रशिक्षण या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण ऑफलाईन स्वरूपात देण्यात येते. त्याकरीता विद्यार्थ्यांना विद्यावेतन व आकस्मिक निधी देखील देण्याची योजना नियमित सुरू आहे.

तथापि, IBPS-PO/Banking/Railway (IBPS), कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे भरती (RRB) तसेच महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) या परीक्षांचे स्वरूपच ऑनलाईन परीक्षा पध्दती असल्याने विद्यार्थ्यांनी अनेकवेळा ऑनलाईन प्रशिक्षणाची मागणी महाज्योती कार्यालयास केली होती. त्यानुसार सदर प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने राबविण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेमार्फत टॅबलेट व डेटा देण्यात येणार आहे. प्रशिक्षणासाठी डेटा सिम निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात आल्याने त्यांच्या क्षेत्रात ज्या स्थिर इंटरनेट सेवा उपलब्ध आहेत त्या इंटरनेट सेवा विद्यार्थ्यांना घेता येतील. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी तसेच संतापाची भावना निर्माण होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

----------------

## राज्यातील अपंग कल्याण महामंडळाकडून दिव्यांगांना देण्यात आलेल्या ई-रिक्षा सदोष असल्याबाबत

**(१५) * ५०२७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगाना सामाजिक न्याय विभागाअंतर्गत अपंग कल्याण महामंडळाकडून देण्यात आलेल्या ई-रिक्षा सदोष असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ई-रिक्षाची बॅटरी कमकुवत असून आसन व्यवस्था नीट नसल्यामुळे वाहतूक करताना रिक्षा अचानक व्हायब्रेट होऊन एका बाजूला कलंडत असल्याने चालक व प्रवाशांच्या जीवास धोका निर्माण झाल्याचे तसेच सदर रिक्षा बनविणारी कंपनी हरियाणा येथील असल्याने रिक्षामध्ये अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर दिव्यांगांना सदोष ई-रिक्षा देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) हे अंशत: खरे आहे.

दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई- व्हेईकल) या योजनेतंर्गत दिनांक १६/०३/२०२४ पासून माहे ऑक्टोबर, २०२५ पर्यंत एकूण ७०३ योग्य वाहनांचे (महामंडळामार्फत प्रसिध्द निविदा दस्ताऐवजामध्ये नमूद तांत्रिक विनिर्देश [Technical Specification]नुसार) मोफत वाटप करण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीत तांत्रिक अडचणींमुळे काही वाहने सदोष असल्याच्या तक्रारी (उदा. बॅटरी डीप डिस्चार्ज, वायरिंग समस्या इ.) प्राप्त झाल्या आहेत. निविदेमध्ये (RFP) नमूद केल्याप्रमाणे एक वर्षापर्यंत वाहनाची देखरेख व नियंत्रण करण्याचे काम नियुक्त केलेले पुरवठादार म्हणजेच मेसर्स मॅक ऑटो इंडिया प्रा. लि. फरिदाबाद, हरियाणा यांचेमार्फत करावयाची असल्याने वेळोवेळी प्राप्त तक्रारी अनुषंगाने त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश सदर कंपनीस महामंडळामार्फत देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने नियुक्त पुरवठादाराकडून वाहनांची दुरुस्ती करून देण्यात येत आहेत.

ई-निविदा प्रक्रियेद्वारे पात्र ठरलेल्या निविदाधारकांमध्ये मेसर्स मॅक ऑटो इंडिया प्रा.लि. फरीदाबाद, हरियाणा यांचे दर इतर निविदाकारांच्या तुलनेत न्यूनतम असल्याने सदर पुरवठादाराची निवड करण्यात आली आहे.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबईने रिट याचिका क्र.१२५९५/२०२५ श्री.सुनिल सुर्यवंशी व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन यामध्ये दिनांक ०३/१०/२०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार वाटप करण्यात आलेल्या सर्व वाहनांची तपासणी करण्याबाबत समिती गठीत करण्यात आली असून त्याअनुषंगाने जिल्हास्तरावर वाहन

तपासणीची कार्यवाही सुरू आहे. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालगुन्हेगारी कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) * ४९९५ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात मागील वर्षभरात बालगुन्हेगारीच्या अंदाजे ३६ हजार घटना नोंदविल्या गेल्या असून, त्यापैकी सर्वाधिक म्हणजे ५२८० गुन्हे महाराष्ट्रातील असल्याची तसेच त्यामध्ये सुमारे ८० टक्के बालगुन्हेगार १६ ते १८ वर्षे वयोगटातील असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने १०० टक्के साक्षरतेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी राबवित असलेल्या विविध साक्षरता मोहीम तसेच शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी जाहीर करण्यात आलेली “प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र” सारख्या उपक्रमांनंतरही हजारो मुले शाळा सोडून गुन्हेगारीकडे वळत असल्याचे भयावह वास्तव “नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो”ने प्रसिध्द केलेल्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये मुले गुन्हेगारीकडे वळण्याची कोणती कारणे आढळून आली तसेच मुलांना गुन्हेगारीपासून परावृत्त करून बालगुन्हेगारी कमी करण्यासाठी कोणत्या नाविन्यपूर्ण उपाययोजना राबविण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो यांनी प्रसिध्द केलेल्या क्राईम इन इंडिया २०२३ या अहवालानुसार देशात बाल गुन्हेगारी च्या एकूण ३१,३६५ घटना नोंदविल्या गेलेल्या असून त्यापैकी ३,९७० घटना या महाराष्ट्रातील आहेत.

महाराष्ट्रातील एकूण बालगुन्हेगारांपैकी ७९.८२ टक्के बालगुन्हेगार हे १६ ते १८ वयोगटातील आहेत.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

बाल गुन्हेगारी कमी करण्यासाठी तसेच अशा बालकांना मूळ प्रवाहात आणण्याकरिता नागपूर शहर पोलीस घटक यांनी राबविलेल्या केअर कार्यक्रमाच्या धर्तीवर विशेष बाल पोलीस पथक (SJPU) व बाल कल्याण पोलीस अधिकारी (CWPO) यांचेकडून केअर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

तसेच राज्यातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शाळा, महाविद्यालये यांना भेटी देऊन पोलीस दीदी, पोलीस काका यांसारख्या उपक्रमांतर्गत गुन्ह्यांच्या विरोधात जनजागृती करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटपातील गैरव्यवहाराची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करण्याबाबत

**(१७) * ५१०३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात सन २०२२ ते २०२४ या आर्थिक वर्षांमध्ये नैसर्गिक आपत्ती अनुदानाच्या वाटपात २४ कोटी ९० लाख ८११ रूपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणातील आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरू असून अनेक आरोपी फरार आहेत तसेच आरोपींनी गैरव्यवहारासंदर्भातील माहिती संगणक प्रणालीतून नष्ट (डिलीट) केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर गैरव्यवहाराबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, जालना तसेच तहसिल कार्यालय अंबड व घनसावंगी येथे तक्रारी प्राप्त झाल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणात चौकशी समिती गठीत केली होती.

सदरच्या चौकशी समितीने चौकशीमध्ये अंबड व घनसावंगी या दोन तालुक्यातील २४१ गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थरीय अधिकारी यांनी इ-पाहणी पंचनामे न करता तसेच जवळचे ओळखीतील, तसेच नातेवाईकांची नावे संबंधित गावामध्ये जमीन नावावर नसताना त्यांची नावे बाधित शेतकऱ्यांच्या यादीत समाविष्ठ करुन त्यांच्या नावे अनुदानाची रक्कम प्राप्त करुन घेऊन स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी रुपये २४ कोटी, ९० लाख रुपयांच्या शासकीय रकमेचा अपहार केल्याने सदर प्रकरणात जिल्हाधिकारी, जालना यांच्या आदेशान्वये व उपविभागीय अधिकारी, अंबड यांनी पुन्हा खात्री करुन दिलेल्या आदेशानुसार सहाय्यक महसूल अधिकारी उपविभागीय अधिकारी, अंबड यांच्या फिर्यादी जबाबावरुन पोलीस ठाणे, अंबड, जिल्हा-जालना येथे गु.र.नं. ४५३/२०२५ भा.न्या.सं. कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९,२३८, ३(५) सहकलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ प्रमाणे एकूण २८ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर व मोठ्या शासकीय रकमेचा अपहार असल्यामुळे पोलीस अधीक्षक, जालना यांनी सदर प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, जालना यांच्याकडे वर्ग केलेला आहे.

(२) सदर गुन्ह्यातील आरोपींचा शोध आर्थिक गुन्हे शाखेमार्फत घेण्यात येत असून आजपावेतो एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी अनुदान वाटपामध्ये वापरण्यात आलेले संगणक संचामधुन आरोपींनी चौकशी दरम्यान डाटा डिलीट केलेला असल्याचे फिर्यादीमध्ये नोंद आहे.

सदर प्रकरणात वापरण्यात आलेले एकूण १३ संगणक संच जप्त करण्यात आलेले असून त्यांची सायबर एक्सपर्टच्या सहाय्याने तपासणी करण्याचे काम सुरु आहे.
(३) सदर प्रकरणी ग्रामस्थरीय अधिकारी (तलाठी) व जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यरत असलेले ऑपरेटर व इतर असे एकूण २८ आरोपींविरुध्द उक्त प्रमाणे गुन्हा नोंद असून एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ प्रभावाने शासन सेवेतुन निलंबित करण्यात आले असून सध्या गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) विलंब नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना न देण्याबाबत

**(१८) * ५७९४ श्री.योगेश टिळेकर, श्री.कृपाल तुमाने, श्री.अमित गोरखे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वीज कामगार संघटनांनी महावितरणच्या कार्यक्षेत्रात खाजगी कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना देण्यात येऊ नये या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी राज्यात तीन दिवसीय निदर्शने, संप पुकारला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सौर ऊर्जेमार्फत वीज निर्मिती करीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड यांनी मोठ्या प्रमाणात खाजगी कंपन्यांसोबत वीज खरेदी करार केले असून, सदर खाजगी कंपन्यांनी अद्याप सौर ऊर्जा उत्पादन सुरु केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपन्यांना त्यामुळे नोटीसा बजाविण्यात आल्या असून, अनेक कंपन्यांचे करार रद्द करण्यात आले आहेत ज्यामध्ये काही केंद्र व राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम देखील आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवीन व नवीकरणीय ऊर्जा विभाग व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या नियमानुसार राज्यातील एकूण ऊर्जा उत्पादनाच्या सुमारे ५% इतकी ऊर्जा ही अपारंपरिक ऊर्जा स्रोतातून उत्पादीत करणे अनिवार्य असतानाही आपल्या राज्यात न्यूनतम उत्पादन होत नसल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगामार्फत नोटीस बजाविण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नवीन निविदा प्रकाशित होण्याकरिता तसेच तांत्रिक बाबी पूर्ण करून ऊर्जा उत्पादन सुरु होण्यासाठी जास्त कालावधी लागत असल्याने व अपारंपरिक ऊर्जा मार्फत विजनिर्मिती आवश्यक असल्याने या पूर्वी करार केलेल्या व कंपन्यांनी काम सुरु न केलेल्या कंपन्यांना पुनः संधी उपलब्ध करून देणेबाबत तसेच वीज कामगार संघटनेच्या मागण्यां मान्य करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समिती (७ संघटना) यांनी त्यांच्या राज्यस्तरीय तीनही वीज कंपन्यातील प्रलंबित प्रश्नांबाबत विविध ठिकाणी निर्दशने करुन दिनांक ०९/१०/२०२५ रोजीचा संप सुरु करुन दिनांक १०/१०/२०२५ रोजी संप मागे घेतला.

(२) हे अंशत: खरे आहे.

पारदर्शक पध्दतीने स्पर्धात्मक ई-निविदा राबवून राज्यात सौर ऊर्जेमार्फत वीज निर्मिती करण्याऱ्या खाजगी कंपन्यासोबत महावितरण कंपनीने खरेदी करार केलेले आहेत. दिनांक ३०/११/२०२५ रोजी पर्यंत ७१८१ मे.वॅ क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

सौर ऊर्जा प्रकल्पाची प्रगती असमाधानकारक असलेल्या प्रकल्प धारकांना वीज खरेदी कराराप्रमाणे कामगिरी सुधारण्याबाबत नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

सन २०२४-२५ करिता नवीकरणीय ऊर्जा खरेदीचे उद्दिष्ट १७.५ % साध्य झाले आहेत.

(५) सौर ऊर्जा प्रकल्पाची प्रगती असमाधानकारक असलेल्या प्रकल्प धारकांना वीज खरेदी कराराप्रमाणे कामगिरी सुधारण्याबाबत नोटिसा बजावण्यात आल्या असून त्यांना कामगीरी सुधारण्याची संधी उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीमधील संघटनांनी दिलेल्या संप नोटिस मधील विविध प्रश्नासंदर्भात दिनांक ०६/१०/२०२५ रोजी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या स्तरावर व सर्व संचालक वर्ग यांच्या उपस्थितीत बैठक आयोजिक करण्यात आली. तसेच अप्पर मुख्य सचिव (ऊर्जा) मुंबई यांच्या स्तरावर मंत्रालय येथे देखील दिनांक ०६/१०/२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत संघटनेने दिलेल्या संप नोटिसमधील सर्व मुद्दयावर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली व त्याचे इतिवृत्तांत कृती समितीला देण्यात आले.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील मराठा दप्तर कार्यालयातील दस्तावेजांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१९)** * **५५२० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मराठा दप्तर कार्यालयात संग्रहीत सुमारे पाच कोटी दस्तावेजांपैकी अनेक ऐतिहासिक दस्तावेज दुर्लक्षित स्थितीत असून, शिवकालीन ते पेशवेकालीन आणि ब्रिटिशकालीन दस्तावेज अद्याप सार्वजनिक प्रकाशनापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दस्तावेजांचे वर्गीकरण, सूचीकरण, डिजिटायझेशन व शोधनियोजन न झाल्यामुळे ऐतिहासिक संशोधनासाठी मौल्यवान ठरणारे अनेक मूळ पुरावे नष्ट होत असल्यामुळे इतिहास अभ्यासकांना अभ्यासासाठी आवश्यक साधने उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालयातील अनेक दस्तावेज मोडी लिपीत असून, त्याच्या अभ्यासासाठी आवश्यक तज्ज्ञ, संशोधक, अनुवादक व लिपीविशेषज्ञ यांच्या अभावामुळे दस्तावेजांची स्थिती गंभीर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील अनेक वर्षांमध्ये शासनांने मराठा दप्तर कार्यालयाच्या माध्यमातून अभ्यासपूर्ण ग्रंथप्रकाशन, प्रदर्शन तसेच ऐतिहासिक संग्रहालय उभारणीसारख्या कोणत्याही योजना राबविल्या नसल्यामुळे दस्तावेजांचे जतन होत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर ऐतिहासिक दस्तावेजांचे जतन, डिजिटायझेशन, भाषांतर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

पुराभिलेख संचालनालयाच्या अधिनस्त पुणे येथील पुणे पुरालेखागार कार्यालयात उपलब्ध ऐतिहासिक दस्तावेजांचे जतन व संशोधन करण्याचे काम प्रामुख्याने केले जाते. त्यासाठी अभिलेख कक्षांमधील रुमालांची दैनंदिन साफसफाई, महिन्यातून २ वेळा जंतुनाशक औषध फवारणी व टरमाईट ट्रिटमेंट केली जाते. जीर्ण अभिलेखांना नॉर्वेजियन टिश्यू पेपर लावण्याची प्रक्रिया केली जाते तसेच वाळवी प्रतिबंधक उपाययोजना म्हणून कीटक-नाशनासाठी पॅराडीक्लोरोबेन्झीन (paradichlorobenzene) पावडर व डांबरगोळयांचा दैनंदिन वापर केला जातो ज्यामुळे संबंधित अभिलेख सरंक्षित केला जातो.

(२) हे खरे नाही.

पुराभिलेख संचालनालयाच्या अधिनस्त पुणे पुरालेखागार कार्यालयातील बहुतांश कागदपत्रांचे सूचिकरण व वर्गीकरण झालेले असून त्यानुसार १३ फेरिस्त (मार्गदर्शक पुस्तिका) उपलब्ध असून पुणे कार्यालयात येणाऱ्या इतिहास अभ्यासक व सर्वसामान्य नागरिकांना कार्यालयीन वेळेत अभ्यासाकरीता उपलब्ध करुन दिल्या जातात. त्याआधारे संशोधक त्यांना आवश्यक कागदपत्राची उपलब्धता तपासून पाहू शकतात. तसेच मोडी लिपी अवगत असणाऱ्या इतिहास संशोधकांना संशोधन करण्यास शासन निर्णयातील नियमानुसार परवानगी दिली जाते. त्यानुसार दरवर्षी इतिहास संशोधकांची नोंदणी पुणे पुरालेखागार कार्यालयात केली जात असते व त्यानुसार त्यांना मोडी कागदपत्रे अभ्यासासाठी उपलब्ध करुन दिली जातात.

(३) हे खरे नाही.

पुराभिलेख संचालनालयाच्या अधिनस्त पुणे पुरालेखागार कार्यालयातील अभिलेख मोडीलिपीत असल्यामूळे कार्यालयाच्या स्थापनेपासून मोडीलिपी जाणकार / तज्ञ यांची पदे अस्तित्वात आहे. सद्य: स्थितीत मोडीलिपी अवगत असणाऱ्या ११ संशोधन सहायक मंजूर पदांपैकी ७ पदे कार्यरत असून ४ पदे रिक्त आहेत. पुणे पुरालेखागार कार्यालयातून मोडी कागदपत्रांच्या शासन निर्णय २०१३ नुसार प्रमाणित प्रती विहीत शुल्क आकारुन पुरविण्यात येतात. त्यामूळे लिप्यंतर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) हे खरे नाही.

पुराभिलेख संचालनालयाच्या अधिनस्त पुणे पुरालेखागार कार्यालयातील ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनाच्या आधारावर ग्रंथ प्रकाशित केले जातात. मागील अनेक वर्षांपासून ग्रंथ प्रकाशनाचे काम करण्यात येत आहे. मागील ०३ वर्षात पुणे पुरालेखागारातील कागदपत्रांवर आधारीत ०३ ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले आहे. तसेच संचालनालय स्तरावरून प्रती वर्षी महसूल विभागनिहाय प्रदर्शनाचे आयोजन केले जाते.

(५) हे खरे नाही.

ऐतिहासिक दस्तावेजांचे जतन करण्याच्या दृष्टीकोनातून अभिलेखांचे डिजिटायझेशन काम करण्यात येत असून सद्य: स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

भाषांतर करण्याबाबत केलेल्या उपाययोजना-

पुराभिलेख संचालनालय स्तरावरुन दरवर्षी महाराष्ट्रात प्रत्येक महसूली विभागनिहाय मोडी लिपीच्या प्रचार व प्रसाराकरीता प्रत्येकी एक याप्रमाणे ७ मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते.

(६) लागू नाही.

-----------------

## मौजे पहाडी गोरेगांव, अंधेरी (प), मुंबई येथील कांदळवन वृक्षांची बेकायदेशीररित्या तोड करून अनधिकृत भराव केल्याबाबत

**(२०) * ५१८६ ॲड.अनिल परब, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पहाडी गोरेगांव, अंधेरी, बोरीवली, मुंबई येथील सर्व्हे नं १६१ पै.नं.भू.क्र १६७, १६८ व १६९ आणि न.भू.क्र १ पै येथे कांदळवन तोड व अनधिकृत भरावाबाबत अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेवर कांदळवनापासून ५० मी. अंतरामध्ये भराव केल्याचे आणि तसेच काही कांदळवन वृक्षांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कांदळवनांची तोड करून अनधिकृत भराव करणाऱ्या संबंधित जमीन मालक व कंपनीवर दंडात्मक कारवाई करून गुन्हा दाखल केल्याचे गत पावसाळी अधिवेशनामध्ये सभागृहात लक्षवेधी सूचनेवरील उत्तरामध्ये नमूद केले होते, परंतु प्रत्यक्षात दंडात्मक कारवाई वा गुन्हा दाखल झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी खोटी माहिती पुरविण्याऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द व सदरहू कांदळवनाची तोड करणाऱ्या व अनधिकृतरित्या भरावाचे काम करणाऱ्या जमीन मालक व कंपनीवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मौजे-पहाडी गोरेगांव, ता.बोरीवली येथील स.नं. १६१/पै. या खाजगी जागेवर कांदळवना पासून ५० मी. अंतराच्या आत भरणी, कांदळवन तोड केल्याने खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करुन दंडात्मक कार्यवाही केलेली आहे.

१. मे. उषा मधू डेव्ह. को.ऑ.हौ.सो., Billine Impex Pvt. Ltd., Pearl Coshem Pvt. Ltd., मे. महालक्ष्मी इंटरप्राईझेस यांचे विरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ (१)(२) अन्वये ओशिवरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१४३९/२०२४, दिनांक २०/१२/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

२. नव्याने कांदळवन तोड व भराव केल्याचे निदर्शनास आल्याने मे. उषा मधू डेव्ह. को.ऑ.हौ.सो., Billine Impex Pvt. Ltd., Pearl Coshem Pvt. Ltd., मे. महालक्ष्मी इंटरप्राईझेस यांचे विरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चेकलम १५ (१)(२) अन्वये ओशिवरा पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. १४३५/२०२५, दिनांक ०४/११/२०२५ रोजी नव्याने गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

३. अनधिकृत गौणखनिज उत्खनन केल्याने दंडात्मक कारवाई करून तहसिलदार बोरीवली यांचे आदेश दिनांक १८/०५/२०२४ नुसार रक्कम रुपये २,२२,७०५/- दिनांक २०/०६/२०२४ रोजी वसूल करण्यात आली आहे.

४. नव्याने अनधिकृत गौणखनिज उत्खनन करण्यात आल्याने तहसिलदार बोरीवली यांचे आदेश दिनांक २१/०४/२०२५ नुसार रक्कम रु ८७.२६ कोटी दंड आकारण्यात आला आहे.

५. सदर तहसिलदार बोरीवली यांचे दिनांक २१/०४/२०२५ रोजीच्या दंडात्मक कार्यवाही आदेशा विरोधात Billine Impex Pvt. Ltd. & Anr यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२९९८/२०२५ व रिट याचिका क्र.२०६२६/२०२५ दाखल केलेली आहे.सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दिनांक १४/०७/२०२५ चे आदेशानूसार तहसिलदार बोरीवली यांच्या दिनांक २१/०४/२०२५ चे आदेशास पुढील सुनावणी पर्यंत मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील महिलांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२१) * ५४११ श्री.एकनाथराव खडसे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील अनेक महिलांना बचत गटाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना व कर्ज सुविधा मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या तीन महिलांनी महिला आर्थिक विकास महामंडळाचे बनावट शिफारस पत्र बनवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजनाड (ता.रावेर, जि.जळगाव) येथील महिला बचत गटाची रक्कम व्यक्तिगत फायद्यासाठी वापरून सुमारे ९० लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, भंडारा व जळगाव जिल्ह्यातील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने लाखो रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महिलांना बचत गटाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना व कर्ज सुविधा मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस ठाणे, भंडारा येथे भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (२), ३१६ (५), ३१८(४), ३३६(२), ३३६(३),३३८,३४० (२), ३ (५) २०२३ अन्वये दिनांक २७/०८/२०२५ रोजी गुन्हा क्र.११५५/२०२५ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली होती. दिनांक ०५/०९/२०२५ रोजी सदर आरोपींना जामिन मिळाला असून गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

अजनाड (ता.रावेर, जि.जळगाव) येथील महिला बचत गटाची रक्कम व्यक्तिगत फायद्यासाठी वापरून सुमारे ९० लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी पोलीस ठाणे, रावेर येथे भारतीय न्यायसंहीता कलम ३१८(४), ३१६(२) अन्वये दिनांक २०/०८/२०२५ रोजी गुन्हा क्र. ३४८/२०२५ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एक आरोपी निष्पन्न झालेला असून सदर आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध घेण्यात येत आहे. सदर आरोपीचा अटकपूर्व जामिन मा.न्यायालयाने नामंजूर केला आहे. पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्या दिनांक १९/०९/२०२५ च्या आदेशान्वये सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ॲप आधारित टॅक्सी चालकांची ॲग्रीगेटर कंपनीकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याबाबत

**(२२) * ५५६४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओला, उबेर, रॅपिडो व इतर ॲप आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या ॲग्रीगेटर कंपनी प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारणी करित असून प्रवाशांप्रमाणेच टॅक्सी चालकांचीही आर्थिक पिळवणूक होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲप आधारित कंपन्यांकडून नैसर्गिक आपत्ती व अडचणीच्या काळात कल्याण ते सीएसएमटी/चर्चगेटसाठी सुमारे रुपये २,४०० /- आणि सीएसएमटी ते ठाणे मार्गासाठी सुमारे रुपये

१,५००/- एवढी अवाजवी आकारणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओला, उबेर, रॅपिडो व इतर ॲप आधारित टॅक्सी चालकांनी ॲग्रीगेटर कंपन्यांकडून होणाऱ्या आर्थिक पिळवणूक व शोषणाविरुध्द दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ रोजी राज्यातील मुंबई-पुणे-नाशिक व इतर प्रमुख महानगरात टॅक्सी बंद आंदोलन करून परिवहन विभागाकडे मागण्यांचे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चालकांनी सादर केलेल्या निवेदनामध्ये कोणत्या मागण्या करण्यात आल्या असून कंपन्यांद्वारे प्रवाशांकडून करण्यात येणारी अवाजवी भाडे आकारणीची चौकशी केली आहे काय तसेच प्रवासी व चालक या दोघांच्याही अडचणी वाढविणाऱ्या अवाजवी भाडेवाढ, शोषण व मनमानी रोखण्यासाठी शासनाने कोणत्या अटी व शर्थी, नियम किंवा नियंत्रणात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) याबाबतची बातमी दिनांक १५/०८/२०२५ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४) महाराष्ट्र राज्यात ॲप बेस वाहनांसाठीच्या समुच्चयक धोरणाकरीता श्री.सुधीरकुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या शिफारशी आधारभूत मानून तयार करण्यात आलेले समुच्चयक (Aggregators) धोरण लागू करण्यास दिनांक २९/०४/२०२५ रोजी आयोजित मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात ॲप बेस वाहनांसाठी समुच्चयक धोरण लागू करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ऑटो रिक्षा /कॅब यांच्याकरीता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने निश्चित केलेले दर आधार दर असतील, मागणी कमी असलेल्या वेळेत देण्यात येणाऱ्या सुटीचा दर हा फेरीच्या दराच्या २५% इतका मर्यादित करण्यात यावा, तसेच जास्त मागणी असलेल्या वेळेत दर १.५ पटीपेक्षा जास्त नसावेत, चालकांना एकूण भाडेदराच्या किमान ८०% रक्कम मिळावी इ. बाबी समाविष्ट आहेत. सदर धोरणाबाबतच्या नियमावलीची प्रारुप अधिसूचना दिनांक ०९/१०/२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये निर्गमित करण्यात आली असून सदर नियम अंतिम करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक २०/११/२०२५ या कालावधीमध्ये परिवहन विभागाची परवानगी न घेता ॲप आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांच्या एकूण ५२० दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली असून रुपये २०.५२ लक्ष इतका दंड आकारण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात लम्पी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(२३) * ५१७० श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सोलापूर, अहिल्यानगर, पुणे, सिंधुदूर्ग यासह अनेक जिल्हयांतील पशुधनांना लम्पी रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याचे दिनांक २९ जुलै,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रोगामुळे सोलापूर जिल्ह्यातील १७, अहिल्यानगर जिल्ह्यातील १४ व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील २ पशूधन तसेच पुणे जिल्ह्यातील अनेक जनावरे दगावली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लम्पी रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता पशूधन लस टोचणी व त्यावर उपचार करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात लम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव माहे जुलै २०२५ पासून सुरु झाला असून राज्यातील ३२ जिल्हयांमध्ये दिनांक १८/११/२०२५ पर्यंत एकूण ३०,३९८ बाधित पशुरुग्ण आढळून आले आहेत. पैकी २७,३६२ पशुरुग्ण उपचाराअंती बरे झाले असून १,११३ पशुधनाचा मृत्यू झाला आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यात ९९ अहिल्यानगर जिल्ह्यात १८६ व सिंधुदुर्ग जिल्ह्यात ९ पशुधनाचा मृत्यू झाला आहे.

(३) व (४) राज्यातील लम्पी चर्म रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता १,१५,०९,४२० पशुधनापैकी १,१०,३२,७२९ पशुधनास (९६.०० टक्के) लसीकरण करण्यात आले आहे. सोलापूर, अहिल्यानगर, सिंधुदुर्ग व पुणे जिल्ह्यात अनुक्रमे ९७ टक्के, १०० टक्के व १०० टक्के गोवर्गीय पशुधनास लसीकरण करण्यात आले आहे. पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुवैद्यकीय चिकित्सालये तसेच १५३ फिरते पशुचिकित्सा पथकामार्फत पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव प्रामुख्याने गोचीड, गोमाश्या मुळे होत असल्याने गोचीड गोमाश्या निर्मुलनासाठी गोठ्यात किटकनाशक व जंतुनाशक औषधांची नियमित फवारणी ग्रामपंचायतीच्या मदतीने करण्यात येत आहे. तसेच लम्पी चर्मरोगाबाबत जनजागृती करण्यासाठी प्रसिध्दी व प्रचार कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

-----------------

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध शहरांमध्ये वीजपुरवठा खंडीत होत असल्याबाबत

**(२४) * ४६७९ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली, तळोजा या शहरातील नागरिक, व्यापारी व विद्यार्थी हे नियमितपणे विजेची देयके भरत असतानाही दिवसातून अनेकवेळा वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड नाराजी असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून पनवेल महानगरपालिका हद्दीतील शहरी भागात विजेचा पुरवठा खंडित होऊ नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली, तळोजा या शहरी भागात माहे-सप्टेंबर ते नोव्हेंबर, २०२५ दरम्यान वीज वाहिन्यांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे तसेच महावितरण कंपनीमार्फत देखभाल व दुरुस्तीकरीता वीज पुरवठा खंडीत झालेला आहे.
(२) पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली, तळोजा या शहरातील भागासाठी अखंडित वीज पुरवठा करण्याकरीता महावितरण तर्फे वितरण व्यवस्था सक्षमीकरण करण्याकरीता पायाभुत आराखडा तसेच इतर केंद्र शासनाच्या योजनांतून रोहित्र क्षमता वाढ, नविन रोहित्रे, जिर्ण झालेले खांब बदलणे, कमी दाबाचा वीज पुरवठा होणाऱ्या ठिकाणाचे विज खांब व तारा बदलणे इ. कामे हाती घेण्यात आली आहेत.

तसेच, पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली, तळोजा या शहरातील वीज ग्राहकांना २४*७ वीज पुरवठा देण्याकरिता सेक्टर २५ कामोठे, अरिहंत डेव्हलपर्स, रोहिंजण व महालक्ष्मी नगर, नेरे या उपकेंद्रांना मंजूरी देण्यात आली असून, संबंधित एजन्सीला LOA देण्यात आले आहेत. यापैकी, महालक्ष्मी नगर, नेरे उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

तसेच २२०/२२ केव्ही टिंबर मार्ट अतिउच्चदाब उपकेंद्रामधुन पॉवर इव्हाक्युशेन या योजनेंतर्गत ५० किमी. भुमिगत उच्चदाब वाहिनी टाकुन पनवेल व कळंबोली शहरातील उपकेंद्र यांना अति उच्चदाब उपकेंद्रातून इनकमर वाहिनी टाकण्यात येणार आहे. तसेच नवीन आऊटगोइंग वाहिनीचे विभाजन करुन नवीन वीज वाहिनी प्रस्तावित करण्यात आली असून, सदरच्या कामाचा LOA देण्यात आला असून, सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.

या व्यतिरिक्त आरडीएसएस योजनेंतर्गत नवीन उपकेंद्रे, उपकेंद्र क्षमता वाढ, नवीन रोहित्र, रोहित्र क्षमतावाढ, खराब झालेले विद्युत खांब व वाहिन्या बदली करणे इ. कामे प्रस्तावित करण्यात आलेली असून, सदर प्रस्तावित कामे पूर्ण झाल्यानंतर पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली, तळोजा या शहरातील वीज ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा देण्यास मदत होणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना "मागेल त्याला सौर कृषी पंप" योजनेंतर्गत सौर वीजेचे कनेक्शन देण्याबाबत

**(२५) * ५२७५ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील २१६० शेतकऱ्यांनी सौर कृषी पंप योजनेसाठी आवश्यक रक्कम भरून तीन महिने उलटूनही अद्याप सौर वीज कनेक्शन मिळाले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "मागेल त्याला सौर कृषी पंप योजना" अस्तित्वात असूनही व इतर मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना तसेच प्रधानमंत्री कुसुम योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वीज कनेक्शन न देण्याची व त्यांनी दिवसा वीज उपलब्ध होण्यासाठी केलेले अर्ज तात्काळ निकाली न निघण्याची सर्वसाधारण कारणे कोणती आहेत तसेच सदर अर्जांचा त्वरित निपटारा करून शेतकऱ्यांना सौर वीज कनेक्शन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सांगली जिल्ह्यात मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेंतर्गत दिनांक ०१/१२/२०२५ पर्यंत २६६१ लाभार्थ्यांनी पैसे भरणा केला आहे. त्यापैकी १९११ अर्जदारांनी पुरवठादाराची निवड केलेली असून, यापैकी ७९६ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत. उर्वरित सौर कृषीपंप आस्थापित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) सौर कृषी पंपाची कनेक्शन देणे, हे महावितरणतर्फे जलद गतीने सुरु आहे. राज्यात एकूण १०,७५,००० सौर कृषी पंप आस्थापित करण्यात येणार आहे. राज्यात पी.एम.कुसुम घटक-ब व मागेल त्याला सौर कृषीपंप या योजनेंतगत आजपर्यंत एकूण ६,५२,२११ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहे.

तसेच सांगली जिल्ह्यात पी.एम.कुसुम घटक-"ब" व मागेल त्याला सौर कृषीपंप या योजनेंतगत दिनांक ०२/१२/२०२५ पर्यंत एकूण १०२५५ लाभार्थ्यांनी लाभार्थी हिस्सा भरला असून ९४२६ लाभार्थ्यांनी पुरवठादाराची निवड केली आहे. त्यापैकी एकूण ६९९४ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत. उर्वरित सौर कृषीपंप आस्थापित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

कार्यादेश दिनांकापासून ६० दिवसांच्या मुदतीत सौर कृषी पंप कार्यान्वित न केल्यास संबंधित पुरवठादारास ६० दिवसानंतर प्रती आठवडा ०.५ % इतका व जास्तीत जास्त एकूण कार्यादेशाच्या १०% रक्कम दंड लावण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील पशुधन विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२६) * ५३८७ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील पशुधन विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून निलंबित करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.पशुसंवर्धन मंत्री यांच्याकडे माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुधन विकास महामंडळामध्ये माहे जुलै, २०२५ मध्ये साहित्य खरेदीमध्ये २ कोटी ४८ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार काढून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मा.पशुसंवर्धन मंत्री यांनी गत अधिवेशनामध्ये दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मुख्य कार्यकारी अधिकारी हे ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या ठिकाणीदेखील त्यांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असल्यामुळे त्यांची चौकशी करून फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र पशुधन विकास महामंडळाच्या लेखापरीक्षण अहवालातील निष्कर्ष विचारात घेवून संबंधित अधिकाऱ्याचा अतिरिक्त कार्यभार काढण्यात आला असून संबंधित दोषींविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात येत आहे.

-----------------

## कुर्ला (पूर्व), मुंबई येथील शासकीय निवासस्थाने रिकामी करण्यासाठी कर्मचाऱ्यांना धमकाविण्यात येत असल्याबाबत

**(२७)** * **४७०४ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला (पूर्व), मुंबई येथील राज्य शासनाच्या दुग्धव्यवसाय विभागाची २१ एकर जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी अपात्र असलेल्या रहिवाशांच्या स्थलांतराकरीता वापरण्यात येणार असून, सदर शासकीय वसाहतीमध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय निवासस्थान रिकामी केले नाही तर त्यांना निवृत्तीनंतरचे लाभ मिळणार नाही, अशाप्रकारची समज मदर डेअरीचे व्यवस्थापक यांनी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदर शासकीय वसाहतीमध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यासंदर्भात तसेच सदर शासकीय कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना धमकाविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अखत्यारितील मातृदुग्धशाळा कुर्ला येथे शिल्लक असलेल्या संपूर्ण ८.५ हेक्टर (२१.००३५ एकर) इतके क्षेत्र धारावी पुनर्विकास प्राधिकरणास हस्तांतर करण्यात आलेले आहे.

माहे मार्च, २०२५ मध्ये सर्व कर्मचारी / अधिकारी यांना निवासस्थाने रिक्त करण्याबाबत मौखिक सुचना दिलेल्या होत्या. कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार त्यांच्या मुलांचे शैक्षणिक वर्ष पूर्ण होईपर्यंत म्हणजेच मार्च / एप्रिल २०२५ पर्यंत राहण्यास परवानगी देण्यात आलेली होती.

निवासी कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीनंतरचे लाभ मिळणार नाहीत अशी सूचना वा समज देण्यात आलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील बकरी पालन उद्योजक विकास कार्यक्रम अंतर्गत प्रकल्पांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२८) * ६०३६ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय पशुधन मिशन (एनएलएम) अंतर्गत बकरी पालन उद्योजक विकास कार्यक्रम योजना राबविण्यात येत असून, या योजनेंतर्गत राज्य शासनाच्या ३६६ प्रकल्पांना मंजूरी मिळाली असून त्यापैकी १९० प्रकल्पांना केंद्र शासनाकडून अनुदान अद्याप मिळाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून सदर बकरी प्रजनन फार्मसाठी ज्याची कमाल मर्यादा ५० लाख रुपये इतकी आहे त्याच्या ५० टक्के अनुदान दिले जाते व तथापि, चंद्रपूर येथील ३ प्रकल्पांसह अन्य १९० प्रकल्पांचे अनुदान केंद्र शासनाकडून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुधन मिशन (एनएलएम) अंतर्गत अन्य १९० प्रकल्पासाठीचे प्रलंबित असलेले अनुदान देण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन तातडीने अनुदान देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे आहे, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन योजनेंतर्गत ३६६ प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे त्यापैकी १८८ प्रकल्पांना अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला आहे. उर्वरीत १७८ प्रकल्पांपैकी ६५ प्रकल्पांच्या अनुदान वितरणाचा प्रस्ताव केंद्रशासनाकडे व ११३ प्रकल्प बँक किंवा लाभार्थ्यांच्या स्तरावर प्रलंबित आहेत. यामध्ये समावेश असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील ५ मंजूर प्रकल्पांपैकी २ प्रकल्पांना पहिल्या टप्प्याचे अनुदान वितरित करण्यात आले असून २ प्रकल्प अनुदान वितरणासाठी केंद्रशासनाकडे व १ प्रकल्प बँकेच्या स्तरावर प्रलंबित आहे.

(३) व (४) मंजूर प्रकल्पांना लवकरात लवकर अनुदान उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र शासनाच्या विविध बैठकांच्या माध्यमातून आणि सचिव तसेच मा.मंत्री स्तरावरूनही पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील उद्ववाहन परवाने प्रक्रियेच्या केंद्रीकरणामुळे अडचणी येत असल्याबाबत

**(२९) * ५११७ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उद्ववाहन परवाने मुंबई येथून दिले जात असल्यामुळे संपूर्ण राज्यातील व्यावसायिकांना उद्ववाहन परवाना मिळवण्यासाठी अनेक अडचणींना सामना करावा लागत असल्याची बाब माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोल्हापूर, अकोला यांसारख्या जिल्ह्यांतील व्यावसायिकांना उद्ववाहन परवाना मिळविण्यासाठी अधिक वेळ व आर्थिक खर्च करावा लागत असून संबंधित परवाने वेळेवर मिळत नसल्यामुळे प्रकल्प प्रलंबित राहत असून त्याचा परिणाम गुंतवणूकीवर होत आहे तसेच राज्य शासनाने उद्ववाहन परवाना प्रक्रियेचे विकेंद्रीकरण न करता मुंबईच्या एका निरीक्षकाच्या हाती संपूर्ण राज्याचा भार टाकल्यामुळे सदर परिस्थिती निर्माण झाली असून, परिणामी नियामक त्रुटी, कामकाजात विलंब व अपारदर्शकता वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ मध्ये तयार करण्यात आलेल्या उद्ववाहन परवाना नियमावलीत सुधारणा करून नवीन नियमावली तयार करण्यात शासन अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाची उद्ववाहन परवाना प्रक्रियेच्या केंद्रीकरणाच्या धोरणामागची भूमिका काय आहे, या प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या अडचणींबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सद्य:स्थितीत लागू असलेल्या महाराष्ट्र उद्ववाहन अधिनियम, १९३९ अंतर्गत शासन अधिसूचना दिनांक २८/०४/२०२५ अन्वये उद्ववाहन परवाना देण्याबाबतच्या कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. शासनाची सदर विकेंद्रीकरणाची भूमिका विचारात घेऊन विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने महाराष्ट्र उद्ववाहन, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ मध्ये आवश्यक दुरुस्ती करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर दुरूस्ती अधिनियम लागू झाल्यानंतर या अधिनियमांतर्गतचे नियम अधिसूचित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

(४) व (५) उद्ववाहन परवाना देण्याबाबतच्या कामकाजाचे ऊर्जा विभागाच्या शासन अधिसूचना दिनांक २८/०४/२०२५ अन्वये विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ व जिल्हा विद्युत निरीक्षण कार्यालयस्तरावर अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

-----------------

## मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

**(३०)** * **४७९६ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड क्लीन एअर' (सीआरईए) या संस्थेने मागील ६ महिन्यांत देशातील २३९ शहरांतील हवेची गुणवत्ता तपासून प्रसिध्द केलेल्या अहवालात मुंबईच्या हवेत विषारी कणांची पातळी सरासरी २.५ पीपीएम इतकी नोंदविण्यात आल्याची धक्कादायक बाब दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सायन, देवनार, कांदिवली, बोरिवली, माझगाव या भागातील हवेची गुणवत्ता खालावल्यामुळे मुंबईतील विषारी कणांची पातळी ही राष्ट्रीय मानकांपेक्षा वाढल्याने मुंबईकरांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले असून मुंबईत हवेचे प्रदूषण रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सीआरईए संस्थेच्या संकेतस्थळावर (Monthly ambient air quality snapshot for India, August-२०२५) प्रसिध्द करण्यात आलेल्या अहवालानुसार मुंबई शहराच्या हवेतील पीएम २.५ (Particulate Matter २.५) प्रदुषकांची पातळी सरासरी ३० ugm/m³ पेक्षा कमी दर्शविण्यात आली असून, ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांच्या विहीत मर्यादेत असल्याचे निदर्शनात येते.
(२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन परिसरातील सतत वातावरणीय हवा गुणवत्ता केंद्राच्या मासिक अहवालानुसार वायु गुणवत्ता निर्देशांक (AQI) प्रामुख्याने समाधानकारक (AQI ५१-१००) व ‘मध्यम’ (AQI १०१-२००) श्रेणीत नोंदविला गेला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या प्राप्त अहवालानुसार मुंबई शहर व उपनगरातील रुग्णालयात नोंद झालेल्या श्वसन विकारांच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे आढळून येत नाही.
(३) मुंबई शहर व परिसरातील हवा प्रदूषणाबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी स्वहीत याचिका क्र.३/२०२३ मध्ये पारीत केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मुंबई महानगर परिसरातील हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता उपाययोजना करण्याकरिता आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने दिनांक ०५/०२/२०२४ रोजी समन्वय समिती स्थापन केलेली आहे. सदर समितींच्या शिफारशींनुसार हवा प्रदूषणाला आळा घालण्याकरीता विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

- बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ‘मुंबई वायु प्रदूषण शमन योजना-२०२३’ ची प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना प्रारंभी लेखी सूचना (Intimation), दिल्यानंतर ‘कारणे दाखवा नोटीस’ आणि ‘काम थांबवण्याची नोटीस या विभागामार्फत देण्यात येतात. ०१ ऑक्टोबर, २०२४ ते ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत सुमारे ८६६३ बांधकामांना कारणे दाखवा नोटीस व ३४९७ ठिकाणी ‘काम थांबवण्याची नोटीस’ देण्यात आली असून सदर कार्यवाही सातत्याने सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज कंपन्यांनी वीज विक्री कराच्या दरात वाढ केल्याबाबत

**(३१) * ५४८८ श्री.अमित गोरखे, श्री.प्रसाद लाड, श्री.योगेश टिळेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व वीज कंपन्यांच्या औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांच्या वीज विक्री कराच्या दरामध्ये प्रति युनिट ९.९० पैसे इतकी वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याने सौर ऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांना नाहक भुर्दंड बसणार असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणकडून महाराष्ट्रातील उद्योगांच्या वीज देयकांमध्ये माहे सप्टेंबर, २०२५ पासून इंधन समायोजन शुल्क (FAC) व वीज विक्री कराचा अतिरिक्त भार टाकण्यात आल्यामुळे वीज ग्राहकांना १ ते १०० युनिट वापरावर प्रति युनिट ३५ पैसे आणि ५०० युनिटपेक्षा अधिक वापरावर ९५ पैसे प्रति युनिट जास्त द्यावे लागणार असल्याने राज्यातील प्रति युनिट दर ११.७५ रुपये होणार असून त्यामूळे उद्योगांचे मोठे आर्थिक नुकसान होणार असल्याचे तसेच उत्पादन खर्च वाढून अनेक उद्योग तोट्यात जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने दिनांक १ जुलै, २०२५ पासून औद्योगिक वीजदर कमी करण्याचा प्रयत्न करित असताना उद्योजकांना विश्वासात न घेता वीज दरवाढ करण्यात आल्याने तसेच उद्योगांसाठी वीजदरात आवश्यक ती पारदर्शकता न ठेवता कर व एफ.ए.सी. सारख्या शुल्कात वाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि महावितरणने केलेली वीज दरवाढ कमी करून वीज ग्राहकांना माफक दरात वीज उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा व अखंडित वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री कुसूम घटक-ब योजना राबविण्यात येत आहे. या योजनेकरिता निधी उपलब्ध होण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये टाटा पॉवर कंपनी, अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लि. व बेस्ट या कंपनीकडील औद्योगिक, वाणिज्यिक व इतर वर्गवारीतील ग्राहकांना, महावितरण कंपनीच्या वितरण परवान्यातील शहरी क्षेत्रातील औद्योगिक व व्यापारी ग्राहकांना तसेच राज्यातील अन्य क्षेत्रातील औद्योगिक व व्यापारी ग्राहकांना लागू असलेले अतिरिक्त वीज विक्री कराच्या दरामध्ये रुपये ९.९० पैसे प्रति युनिट वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माहे, ऑक्टोबर, २०२५ च्या विद्युत देयकात वाढीव अतिरिक्त वीज विक्री कर आकारण्यात आलेला नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे, जुलै व ऑगस्ट २०२५ मध्ये मा.आयोगाने मंजूर केलेल्या प्रती युनिट वीज खरेदी खर्चापेक्षा प्रत्यक्ष प्रती युनिट खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे सप्टेंबर व ऑक्टोबर २०२५ मध्ये ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये इंधन समायोजन शुल्क आकारण्यात आलेले आहे. माहे, नोव्हेंबर, २०२५ मध्ये ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये इंधन समायोजन शुल्क आकारण्यात आलेले नाही. राज्यातील पात्र उद्योग घटकांना विद्युत शुल्क सवलत, वीज दर सवलत तसेच उद्योग विभागाच्या सामुहिक प्रोत्साहन योजना व अन्य क्षेत्रिय धोरणांतर्गत लाभ व सवलती देण्यात येतात. या लाभ व सवलतींचा विचार करता, अतिरिक्त वीज विक्री कर व इंधन समायोजन शुल्कातील वाढ अल्प आहे.

(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनिमय, २०२४ अन्वये मा.आयोगाने मंजूर केलेला वीज खरेदी खर्च आणि प्रत्यक्षात झालेला वीज खरेदी खर्च यातील तफावत ग्राहकांना मासिक इंधन समायोजन आकार हा मा.आयोगाच्या तिमाही तत्वावर कार्योत्तर मंजूरीच्या अधीन राहून समायोजित करण्यात येतो.

(४) वीज खरेदी खर्च कमी करण्याठी स्वस्त दरात उपलब्ध होणाऱ्या अपारंपारिक ऊर्जा (प्रामुख्याने सौर ऊर्जा) सोबत करार करून वीज खरेदी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरीवली (पूर्व), मुंबई येथील महाकाली नगर गृहनिर्माण प्रकल्पांतील गुंतवणूकदारांची कोट्यवधी रूपयांची फसवणूक झाल्याबाबत

**(३२) * ५५२८ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (पूर्व), मुंबई येथील देवीपाडा परिसरात महाकाली नगर गृहनिर्माण प्रकल्पाच्या नावाखाली शेकडो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारामध्ये अमोघ एंटरप्रायईजेस, जीएसपी डेव्हल्पर्स आणि राईट बिल्टेक प्रा.लि. या कंपन्यांमार्फत नागरिकांना आकर्षक दरात फ्लॅट देण्याचे आश्वासन देऊन प्रत्यक्षात कोणतेही बांधकाम न करता मोठ्या प्रमाणात पैसे वसूल करुन २०० हून अधिक गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक झाली असल्याची तक्रार कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने गुंतवणुकदारांनी गुंतविलेले पैसे परत मिळण्याबाबत व गैरव्यवहारामध्ये दोषी असणाऱ्या संबंधित कंपन्यांविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

ऑगस्ट २०११ ते एप्रिल २०२४ दरम्यान १) अमोघ इंटरप्राईजेस २) निर्माण डेव्हलपमेंटचे भागीदार श्री.उदयकुमार सिंग ३) श्री.गौतम पांडे ४) श्री.निखील कुमार सिंग ५) सोनी प्रापर्टी रिअल इस्टेट एजेंट श्री.हितेश सोनी व ६) श्री विशाल सोनी ७) जी.एस.पी.डेव्हलपर्स प्रा. लिमीटेडचे संचालक श्री.मुकेश पांडे ८) श्री.सुनिल पांडे ९) राईट बिल्टेक प्रायव्हेट लिमीटेड यांनी बोरीवली पूर्व (मुंबई) येथील देवीपाडा, महाकाली नगर एस.आर.ए. को.ऑ. हौ. सोसायटी लिमिटेड या पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत वास्तु नक्षत्र व स्वागतम या गृह प्रकल्पामध्ये बुकिंग केलेल्या फ्लॅटचा ताबा न देता किंवा बुकिंगची रक्कम परत न करता फिर्यादी तसेच इतर २०० गुंतवणूकदारांची एकूण अंदाजे रुपये ३२ कोटींची आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार दिली असल्याने तसेच राईट बिल्टेक प्रा.लि. ही कंपनी एन.सी.एल.टी. मध्ये गेल्यानंतर सुध्दा त्यांनी फिर्यादींनी बुकींग केलेल्या फ्लॅटच्या बुकिंग बाबतची माहिती एन.सी.एल.सी. कोर्टाला न दिल्यामुळे फिर्यादी यांनी दिलेल्या जबाबावरून फसवणूक करणारांच्या विरुध्द दिनांक ११/०८/२०२५ रोजी कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ३८७/२०२५ भादंवि, कलम ४०९,४२०,३४ (आ.गु.वि. ७०/२०२५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्हा पुढील तपासकामी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे वर्ग करण्यात आला असून गु.र.क्र. ७०/२०२५ अन्वये तपासावर घेण्यात आला आहे. सदर गुन्हयातील प्रकल्पामध्ये गुंतवणुक करणारे एकूण २२ नागरिकांचे जबाब नोंद करण्यात आलेले आहेत. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी यांनी बोरीवली पुर्व (मुंबई) येथील देवीपाडा, महाकाली नगर एस.आर. ए. को.ऑ.हौ. सोसायटी लिमिटेड या पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत वास्तु नक्षत्र व स्वागतम या गृह प्रकल्पामध्ये बुकिंग केलेल्या गुंतवणुकदारांची घेतलेल्या रक्कमेची माहिती मिळणेकरीता आर्थिक गुन्हे विभागामार्फत बँकांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच राजाराम बाबुलाल मांजावकर व गौतम शीवशंकर पांडे यांनी दिनांक २१/०९/२०२५ रोजी मा.विशेष सत्र न्यायालय, ७ वे, मुंबई येथे अटकपूर्व जामीन अर्ज क्र.१८९८/२०२५ व क्र.१८९९/२०२५ दाखल केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पुणे शहरात 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' तसेच 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' अंतर्गत पात्र रुग्णांना उपचार देण्यात येत नसल्याबाबत

**(३३)** * **५६०९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे शहरात अनेक धर्मादाय (Charitable Trust) म्हणून नोंद असलेल्या मोठ्या खासगी रुग्णालयांकडून शासनाने मान्यता दिलेल्या "महात्मा फुले जन आरोग्य योजना" तसेच "आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना" अंतर्गत पात्र रुग्णांना उपचार देण्यात येत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर क्षेत्रातील धर्मादाय संस्थांद्वारे चालविलेल्या किती खासगी रुग्णालयांनी "महात्मा फुले जन आरोग्य योजना" व "आयुष्मान भारत योजना" मध्ये नोंदणी केली असून या रुग्णालयांपैकी किती रुग्णालयांकडून "महात्मा फुले जनआरोग्य योजना" व "आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्ययोजना" अंतर्गत आतापर्यंत किती रुग्णांना मोफत उपचार दिले आहेत व त्याची आकडेवारी काय आहे,

(३) असल्यास, राज्यात विशेषत: पुणे शहरात अशा धर्मादाय रुग्णालयांकडून शासनाच्या योजनांचा लाभ देण्यास नकार देण्याचा प्रकार थांबविण्यासाठी शासनाने धर्मादाय रुग्णालयांच्या करसवलती अथवा परवान्यांचे पुनरावलोकन करून सेवा न देणाऱ्या रुग्णालयांवरील सवलती रद्द करुन उपाययोजना व धोरण निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर जन आरोग्य योजनेंतर्गत सेवा देण्यास नकार देणाऱ्या धर्मादाय रुग्णांलयांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अंशत: खरे आहे.

विविध वृत्तपत्रात माहे जून/जुलै, २०२५ च्या सुमारास प्रसिध्द झालेल्या बातम्यांमधून धर्मादाय म्हणून नोंद असलेल्या मोठ्या रुग्णालयात एकत्रित "महात्मा फुले जन आरोग्य योजना" तसेच "आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना" या योजनांचे लाभ दिले जात नसल्याचे प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त माहितीनुसार पुणे जिल्ह्यातील एकूण ६२ पैकी १७ अंगिकृत धर्मादाय रुग्णालयांमधून या योजनांतर्गत दिनांक १ एप्रिल, २०२५ पासून एकूण १२५०७ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.
(३) व (४) शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, दिनांक २१/०४/२०२५ नुसार राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना आरोग्याशी संबंधित "महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना", "आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना" लागू करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी साधू वासवाणी मिशन व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केली असून सदर याचिकेमध्ये सदर शासन निर्णयातील तरतूदी आव्हानित केल्या आहेत. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिकाकर्त्यांना संबंधित प्राधिकरणाकडे सविस्तर निवेदन देण्याबाबत आदेशित केले आहे.

त्यानुसार याचिकाकर्त्यांनी निवेदन सादर केले असून यासंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारितील पोर्ट झोन अंतर्गत जहाजांमधील डिझेल व पेट्रोलजन्य पदार्थांची चोरी होत असल्याबाबत

**(३४) * ४८६७ श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीतील पोर्ट झोन अंतर्गत पोलीस ठाण्याच्या हद्दीत, परदेशातून येणाऱ्या जहाजांमधील डिझेल व पेट्रोलजन्य पदार्थांची चोरी करून ते काळया बाजारात विक्री केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३ ते २०२४ या कालावधीत कार्यरत असलेल्या तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दलालांच्या संगनमताने 'हप्ता' मिळत असल्यामुळे त्यांनी अनधिकृत पध्दतीने मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळवली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित वरिष्ठ पोलीस निरीक्षकांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीतील बंदर परिमंडळ अधिनस्त पोलीस ठाणेंची माहिती पाहता परदेशातुन येणाऱ्या जहाजांमधील डिझेल आणि पेट्रोलजन्य पदार्थांची चोरी करून ते काळया बाजारात विक्री केलेबाबत माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान एकही गुन्हा नोंद नाही.

तथापि, येलोगेट पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०६/११/२०२५ रोजी न्यु फिश जेट्टीसमोरील ॲकेज एरियामध्ये अरबी समुद्रामध्ये ८०० मीटर अंतरावर १) Shri Anant Laxmi PNJ ४३० व २) M.T. PRANAY, BDR-IV-०००९४ या ०२ भारतीय बार्जमध्ये अवैध व चोरीचे डिझेल मिळून आल्याने सदर प्रकरणी यलोगेट पोलीस ठाणे, बृहन्मुंबई शहर येथे गु.र.क्र. २८/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३(२), २८७, ३(५), ६१ सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ कलम ३,४,५,७, सह मोटार स्पिरीट आणि हाय स्पीड डिझेल ऑर्डर, १९९८ (पुरवठा नियमन व वितरण व गैरव्यवहार प्रतिबंध) मधील कलम ३, ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील १० आरोपींना अटक करण्यात आली होती. आरोपी सध्या जामिनावर मुक्त आहेत. आरोपींविरुध्द भारतीय नागरीक सुरक्षा संहिता मधील कलम १२६ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(२) व (३) सन २०२३-२०२४ या कालावधीत बंदर परिमंडळ अंतर्गत पोलीस ठाणेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दलालांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात हफ्ता मिळत असल्यामुळे त्यांनी अनधिकृत पध्दतीने मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळवली असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ, मुंबई या कार्यालयाच्या अभिलेखी नोंद नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांग कल्याण विभागांतर्गतची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) * ५७४६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिव्यांगांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभागाची स्थापना करण्यात आली असून, या विभागासाठी एकूण २,०६३ नवीन पदे निर्माण करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिव्यांग विभागासाठी १,४०० कोटी रुपयांची तरतूद असतानाही, मागील अडीच वर्षांपासून विभागामध्ये फक्त आठ अधिकारी वर्ग कार्यरत असल्याने अनेक दिव्यांग व्यक्तींना विविध योजनांचा लाभ मिळण्यास अडथळा निर्माण होत असल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रात ३० लाखांपेक्षा अधिक दिव्यांग व्यक्ती असून स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग स्थापन होण्यापूर्वी सदर योजना सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली दिव्यांग कल्याण

आयुक्तांमार्फत राबवल्या जात होत्या तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे कार्य पाहत होते अशा परिस्थितीत राज्यभर स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध नसल्याने विभागासाठी मंजूर केलेली पदे तसेच जिल्हा परिषद स्तरावरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील तीस लाख दिव्यांगांना न्याय व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दिव्यांग कल्याण विभाग कार्यक्षम करण्याबाबत तसेच विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.

शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५/१२/२०२२ अन्वये स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग निर्माण करण्यात आला असून, विभागासाठी २०६३ पदे नव्याने मंजूर करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

स्वतंत्र प्रशासकीय विभागासाठी ६७ पदे मंजूर करण्यात आली असून, त्यापैकी सद्य:स्थितीत ४२ पदे कार्यरत आहेत व २५ पदे रिक्त आहेत.

तसेच आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे कार्यालयासाठी ५४ पदे मंजूर असून, सद्य:स्थितीत २८ पदे कार्यरत आहेत.

(३) व (४) दिनांक १ सप्टेंबर, २०२५ पासून सर्व जिल्ह्यातील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालये सुरु करण्यात आली आहेत.

क्षेत्रिय कार्यालयातील मंजूर पदे व कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर मंजूर पदे व वेतनश्रेणी आणि अन्य कार्यालयातील समकक्ष अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार निश्चित केलेल्या क्षेत्रानुसार दिव्यांग कल्याण आयुक्तालय आणि जिल्हा स्तरीय कार्यालयाचे सक्षमीकरण व बळकटीकरण होणे आवश्यक असून, नवीन पदे निर्माण करण्याची आवश्यकता विचारात घेऊन विभागाच्या प्रस्तावित सुधारित आकृतिबंध पुनर्रचनेच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

शासन निर्णय, दिनांक २०/०६/२०२५ अन्वये मंत्रालयीन लिपिक टंकलेखक संवर्गाचे सेवाप्रवेश नियम या विभागाच्या क्षेत्रिय स्तरावरील कनिष्ठ लिपिक संवर्गासाठी लागू करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने कनिष्ठ लिपिक संवर्गाचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.

शासन निर्णय, दिनांक १०/१०/२०२४ अन्वये क्षेत्रिय स्तरावर मंजूर कनिष्ठ लिपिक ही नियमित पदे सेवाप्रवेश नियम तयार होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात बाहययंत्रणेव्दारे व ६४० मंजूर सेवा बाहययंत्रणेव्दारे भरण्याबाबतचा प्रस्ताव उपसमितीच्या मान्यतेसाठी वित्त विभागास सादर करण्यात आला असून, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गोशाळांना थकीत अनुदान वितरीत करण्याबाबत

**(३६) * ४८१७ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः अहिल्यानगर व जळगाव जिल्ह्यात पोलिसांच्या कारवाईत जप्त करण्यात आलेली जनावरे संबंधित गोशाळांकडे सुपूर्द करण्यात येतात, परंतु शासनाकडून गोशाळांना पुरेसे अनुदान उपलब्ध होत नसल्याची बाब माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित गोशाळांमध्ये आणलेली जनावरे सामाजिक संस्थांकडून सांभाळली जात असून, शासनाच्या अपुऱ्या आर्थिक मदतीमुळे गोशाळा आर्थिक अडचणीत सापडल्याने आवश्यक खर्च लोकसहभागातून उभारावा लागत असल्याचे तसेच जळगाव जिल्ह्यातील पांडुरंग पोल संस्थान, दोंडाई वडगाव येथील गोशाळेमध्ये सुमारे ८०० जनावरांसाठी दरमहा २.५ ते ३ लाख रुपये खर्च सामाजिक संस्थांना स्वतःच्या निधीतून करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या प्रचलित नियमांनुसार गोशाळांसाठीचे अनुदान अपुरे असून ते विलंबाने वितरित केले जात असल्याने गोशाळा व्यवस्थापनाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून अन्नधान्य, औषधोपचार व नियमित देखभाली अभावी काही जनावरांचा मृत्यू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, जनावरांची जबाबदारी स्वीकारणाऱ्या सामाजिक संस्थांना आवश्यकतेनुसार सातत्याने व वेळेवर अनुदान उपलब्ध व्हावे यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. जळगाव जिल्ह्यामध्ये दोंडाई वडगाव नावाचे गाव नाही.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

राज्यातील गोशाळा आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हाव्या तसेच गोशाळांनी स्वत:चे उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावे या उद्देशाने गोशाळांमधील देशी गायींना रुपये ५०/- प्रति दिन प्रति गाय असे अनुदान देण्यात येते. याशिवाय गोशाळांमधील गायींना शासकीय पशुवैद्यकीय संस्थांकडून पशुवैद्यकीय आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जुन्या बसेसचे सीएनजी/ एलएनजी मध्ये रूपांतर करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३७) * ५२०६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जुन्या बसेसचे सीएनजी/एलएनजी मध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या योग्य नसतानाही राबविण्यात आल्यामुळे महामंडळास आवश्यक तेवढ्या बसेस उपलब्ध न

होण्याची परिस्थिती निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कामगारांची देणी प्रलंबित असतानाही, दिल्ली स्थित बालाजी कंपनीची देयके तात्काळ अदा करण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाशी संबंधित राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना महापे, पनवेल परिसरात दोन सीएनजी पंप मिळाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले असून, चौकशीच्या अनुषंगाने नियमबाह्य पध्दतीने वाटप करण्यात आलेले सीएनजी पंप रद्द करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२) दिनांक २५ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार रा.प. महामंडळातील डिझेल वाहनांचे सीएनजी वाहनांत रुपांतरण करणे यासाठी निधी प्राप्त झालेला आहे. शासनाच्या निर्देशानुसार ज्या कारणासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे त्याच कामासाठी विनियोग करणे आवश्यक आहे. त्यानुसार डिझेल बसेसचे सीएनजी बसेस मध्ये रुपांतरण करणेसाठी मे. बालाजी एंटरप्राइजेस यांची देयके शासन निधीतून अदा करण्यात आलेली आहेत.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील प्रश्न रद्द झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(३८) * ६०६० श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ रोजी संयुक्त पूर्व परीक्षा व दिनांक २९ जून, २०२५ रोजी संयुक्त (मुख्य) परीक्षा २०२४ घेऊन त्याची अंतिम उत्तरतालिका जाहीर केली परंतु त्या उत्तरतालिकेत १२ प्रश्न रद्द करण्यात आले असून २ प्रश्नांच्या उत्तरामध्ये बदल करण्यात आला असल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १२ प्रश्न रद्द केल्यामुळे व २ प्रश्नांतील बदलामुळे परीक्षार्थींना एकूण २८ गुणांचा तोटा होणार असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही प्रश्नांमध्ये त्रुटी आढळल्याने ते प्रश्न रद्द करण्याशिवाय अन्य पर्याय नव्हता, असा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून माध्यमासमोर खुलासा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित प्रश्नपत्रिका तयार करणे, परिक्षण करणे व छाननी प्रक्रियेमधील त्रुटींसाठी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच सदर चुकीमुळे विद्यार्थ्यांना होणाऱ्या शैक्षणिक व स्पर्धात्मक नुकसानीची भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे अंशत:खरे आहे.

महाराष्ट्र राजपत्रित गट-ब सेवा, संयुक्त(मुख्य) परीक्षा-२०२४ या परीक्षेच्या दोन्ही प्रश्नपत्रिकांच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या. सदर परीक्षेच्या प्रश्नासंदर्भात उमेदवारांनी नोंदविलेल्या आक्षेपांवर संबंधित विषयाच्या/ घटकाच्या मूळ तज्ञांचे अभिप्राय विचारात घेवून पेपर क्र.१ मधील ५ प्रश्न रद्द व २ प्रश्नांचे पर्याय बदल आणि पेपर क्र.२ मधील ७ प्रश्न रद्द असे एकूण १२ प्रश्न रद्द व २ प्रश्नांचे पर्याय बदल करुन अंतिम उत्तरतालिका आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतूदीनुसार आयोगाने रद्द केलेल्या १२ प्रश्नांसाठी कोणत्याही उमेदवाराला गुण देण्यात आले नसल्याने उमेदवारांचे नुकसान झालेले नाही.
(४) व (५) महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही एक सांविधानिक संस्था असून आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे कामकाज आयोगाने निश्चित केलेल्या कार्यनियमावलीतील तरतूदींनुसार करण्यात येते.

आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी प्रश्नपत्रिका तयार करण्याचे काम संबंधित विषयातील तज्ञांकडून करुन घेण्यात येत असून त्यामध्ये आयोगातील अधिकारी/कर्मचारी यांचा कोणताही हस्तक्षेप नसतो.

आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्ये प्रश्न रद्द होणे व प्रश्नांच्या उत्तराचे पर्याय बदल होणे याचे प्रमाण कमी करण्याकरीता आयोगामार्फत अंतर्गत गोपनीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशींनुसार आवश्यक उपाययोजना आयोगाच्या स्तरावर करण्यात येत आहेत.

-----------------

## बामणे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील लिबर्टी ऑईल मिल कंपनीचे सांडपाणी भातसा नदीत सोडल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत

**(३९) * ५४८२ श्री.अमित गोरखे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बामणे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील लिबर्टी ऑईल मिल कंपनीकडून सांडपाणी थेट भातसा नदीत सोडण्यात येत असल्यामुळे पाण्यावर मोठ्या प्रमाणात तेलकट तवंग दिसून येत असून, या दूषित पाण्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, संबंधित कंपनीविरुध्द कारवाई करण्याची मागणी कामडी ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी शहापूर तहसिलदारांकडे केली असून सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) तहसिलदार, शहापूर, ठाणे यांच्या दिनांक ०३/१२/२०२५ रोजीच्या पत्रानुसार तालुका आरोग्य अधिकारी, शहापूर यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी त्यांचे अधिनस्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, अघई यांचेमार्फत करण्यात आलेल्या पाहाणी अहवालात कुठल्याही प्रकारचे सांडपाणी नदीत पात्रात सोडत नसल्याचे निर्दशनास आले असल्याचे नमूद केले आहे. तसेच लिबर्टी ऑईल मिल नजीकच्या बांव-पाड्यात मागील ०४ महिन्यात कुठलाही जलजन्य आजाराचे रुग्ण आढळलेले नाहीत. तसेच, नदी लगतच्या नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबत कसल्याही प्रकारची तक्रार त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेली नाही, असे कळविले आहे.

तसेच सदर तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. लिबर्टी ऑइल मिल या उद्योगाची व परिसराची पाहणी केली असता कोणतेही सांडपाणी भातसा नदीत जात असल्याचे प्रत्यक्षदर्शी आढळून आले नाही. पाहणी दरम्यान उद्योगाजवळील भातसा नदीचे पाण्याचे नमुने गोळा करण्यात आले आहेत. सदर पाण्याच्या गुणावत्तेचे मापदंड मानकांच्या विहित मर्यादेत असल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक महामंडळाच्या अखत्यारितील मोकळ्या जागेचा बेकायदेशीर वापर होत असल्याबाबत

**(४०) * ५६१९ श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (पूर्व), मुंबई येथील संतोष नगर परिसरात हरणाई विद्यालय आणि गुरुकुल इंग्लिश स्कूल समोरील महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक महामंडळाच्या अखत्यारित असलेली मोकळी जागा मद्यपी व गर्दूल्यांचा अड्डा बनली असून, त्याठिकाणी कचऱ्याचे ढीग असल्याने भटक्या श्वानांचा उपद्रव वाढल्यामुळे शाळेतील हजारो विद्यार्थी व स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा प्रशासनाने याबाबत वारंवार तक्रार करुन देखील संबंधित महामंडळाकडून कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून गोरेगाव येथील हरणाई विद्यालय आणि गुरुकुल इंग्लिश स्कूल समोरील मोकळ्या जागी मद्यपी व गर्दूल्यांचा बंदोबस्त करण्याबाबत तसेच कचऱ्याचे ढीग हटवून भटक्या श्वानांचा उपद्रव कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) प्रश्नाधीन विषयासंदर्भात श्री गुरुकुल शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे दिनांक १२/०८/२०२५ रोजीचे पत्र महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई यांना प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) हे खरे नाही. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिंडोशी पोलीस ठाणे यांना वेळोवेळी शाळेच्या परिसरात गस्त घालण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातील सुरक्षा विभागामार्फत दोन सुरक्षा कर्मचारी २४ तास तैनात केलेले असून, सदर ठिकाणी वेळोवेळी गस्त घालण्यात येत आहे. चित्रिकरणापासून तयार होणारा सर्व प्रकारच्या कचऱ्याची विल्हेवाट महामंडळाकडून लावण्यात येत आहे. तसेच, चित्रनगरी परिसरातील भटक्या श्वानांचा बंदोबस्त करण्याकरीता वेळोवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेला पत्राद्वारे विनंती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ई-बसेस प्रकल्पांतर्गत कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(४१) * ५२०५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाने भाडेतत्वावर घेतलेल्या ५१५० ई -बसेस स्वतःचे उत्पन्न ५४ रुपये प्रति किलोमीटर असताना १२ मीटर लांबीच्या बसेसला ७८ रूपये प्रति किलोमीटर दर देण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बसेला चार्जिंगची सुविधा उपलब्ध नसताना प्रत्येक बसला ४०० किलोमीटर प्रवासीभाडे देण्याची हमी दिली असून, सदर प्रकरणामध्ये ७० हजार कोटीं रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी करुन देखील दोषी अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भाडेतत्वावर घेतलेल्या बसेसला चार्जिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांनी नियमबाह्य पध्दतीने निविदा काढून मर्जीतील ठेकेदारांना काम दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने भाडेतत्वावर घेतलेल्या बसेसच्या निविदेत गैरव्यवहार करणाऱ्या दोषीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२), (३), (४) व (५) रा.प. महामंडळाच्या ई बस प्रकल्पांतर्गत १२ मी. बसेस करिता अनुदानासह रुपये ६८/- व अनुदानाशिवाय रुपये ७३/- असे दर निश्चित करण्यात आले आहेत.

रा.प. महामंडळाने भाडेतत्वावर ५१५० ई-बस प्रकल्पांतर्गत ३२५ किमी प्रतिदिन प्रतिबस हमी किमी देण्यात आलेली आहे. ई-बसेस करिता चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, न्युनतम निविदाकारास कार्यादेश देण्यात आले आहेत.

रा.प. महामंडळात भाडेतत्वावरील ई-बस प्रकल्पाच्या निविदेच्या गैरव्यवहार प्रकरणी रा.प.महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत चौकशी करण्यात आली व चौकशीअंती अहवालामध्ये सादर केलेल्या अहवालात जबाबदार धरण्यात आलेल्या कार्यरत रा. प. अधिकाऱ्यांचे विरूध्द रा. प. शिस्त व आवेदन कार्यपध्दतींतर्गत संबंधितांस आरोपत्र बजावून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

तसेच, या संपूर्ण प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे मार्फत चौकशी सुरू आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.